महाराष्ट्र शासन

# अर्घ्य

वार्षिकांक २०१९-२०




स्थापना : २० जुन १९५६

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला

**SANT GADGE BABA**
**AMRAVATI UNIVERSITY**
AMRAVATI - 444602
(M.S.)

✆ : 2662206, 2662207, 2662208, 2662249, 2662358.
website : www.sgbau.ac.in

FAX NO. 0721-2660949, 2662135

No.:SGBAU/8/C-१३५३/2016.
Date: २९.11.2016

To,
The Principal,
Government College of Education,
Dist.Akola.

**Subject :-** **Permanent Affiliation under section 88 of Maharashtra Universities Act, 1994 regarding.**

Ref'nce:- 1)Your letter Outward No.GCE/Akola/Astha/2015-16/423dated 30/12/2015 .

Sir,

With reference to your letter cited above, it is to inform you that, the Academic Council of Sant Gadge Baba Amravati University, in its meeting held on dated 17/10/2016 vide item no.96 resolved to grant Permanent Affiliation to your college for courses/subjects as mentioned in the following table, from the session 2016-2017 subject to the fulfillment of the conditions as mentioned below :-

Even though your college / Institutions is granted Permanent Affiliation it shall continue to pay annual affiliation fee as prescribed in Direction no. 39/2004, dated 20.10.2004.

| Sr.No. | Course/s | Subject/s |
|---|---|---|
| 1. | B.Ed.. | As per syllabus |

Yours faithfully,

Director (BCUD)
Sant Gadge Baba
Amravati University,Amravati.

**Copy with compliments to :-**

1.Director of Higher Education, Maharashtra State, Pune-1
2.Joint Director of Higher Education, Amravati [redacted]i.
3.Controller of Exam, Sant Gadge Baba Amravati University, Amravati.
4.Finance & Accounts Officer, Sant Gadge Baba Amravati University, Amravati.
5.Director of Student Welfare, Sant Gadge Baba Amravati University, Amravati.
6.Dy Registrar (Devp.), Sant Gadge Baba Amravati University, Amravati.

महाराष्ट्र शासन

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला

# अर्घ्य

## वार्षिकांक २०१९-२०

प्रेरक व प्रकाशक
**डॉ. वसुधा वि. देव**
प्राचार्य

संपादक
**डॉ. आशा धारस्कर**
सहाय्यक प्राध्यापक

* अर्घ्य मंडळ सचिव *
कु. मंजुषा तेलगोटे, आकाश रावत

* सदस्य *
श्वेता दुबे, प्रणोती गेडाम, प्रशांत मंडासे, अश्विनी जोशी

अर्घ्य : ARGHYA

प्रकाशक : सर्व हक्क सुरक्षित
शासकीय अध्यापक महाविद्यालय,
रामदासपेठ, अकोला
जि. अकोला (महाराष्ट्र)

अक्षर जुळणी : श्री. कुंदन बोरकुटे
गणराया ग्राफीक्स
पत्रकार कॉलनी, अकोला

मुखपृष्ठ संकल्पना : डॉ. आशा धारस्कर
सहाय्यक प्राध्यापक

वितरण : विनामुल्य

ह्या अंकातील सर्व लेख व कविता काल्पनिक आहे. याचा कुणाच्याही वास्तविक जीवनाशी संबंध नाही. तसेच अंकातील सर्व लेख, कविता, अहवाल हे महाविद्यालय प्रशासकीय यांच्या हक्कात राहतील.

# महाविद्यालयाची ध्येय व उद्दिष्टे




संकल्पना व निर्मिती : डॉ. शांताराम बुटे

# अर्पण पत्रिका



# Big Salute to Corona Warriors

# प्राचार्यांचे मनोगत



आमच्या महाविद्यालयाचा शैक्षणिक सत्र २०१९-२० चा 'अर्घ्य' हा वार्षिकांक एका नव्या रुपात आपल्या अवलोकनार्थ देताना मला मनस्वी आनंद होत आहे.

'अर्घ्य' मंडळाचे, मार्गदर्शकांचे व सर्व विद्यार्थ्यांचे सर्वप्रथम मी अभिनंदन करते. दरवर्षी साकारणाऱ्या वार्षिकांकामधून विद्यार्थ्यांच्या सुप्त प्रतिभेच्या भावनांचा आविष्कार शब्दस्वरुपाने साकारतो. त्याला दिशा देण्याचे काम महाविद्यालयाचा वार्षिकांक करीत आहे. 'अर्घ्य' म्हणजे नव्या नव्या कल्पना, नवलेखक, नवविचारांना संधी देणारा व महाविद्यालयाच्या वार्षिक घडामोडींचा उपक्रम. 'अर्घ्य' च्या निमित्ताने आम्ही महाविद्यालयाच्या वाटचालीचा आलेख मांडत असतो. विद्यार्थ्यांना संस्कारक्षम जीवनासाठी मार्ग दाखविणारा असा हा वार्षिकांक.

विद्यार्थी मित्रांनो, जीवनात मूल्यसंस्कार, श्रमसंस्कार, पर्यावरण संस्कार रूजवून सामाजिक बांधिलकी जपून आदर्श नागरिक होण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करणे आवश्यक आहे. आपण ते कराल अशी मला खात्री आहे. आपल्या उज्वल भविष्यासाठी खूप खूप शुभेच्छा!

सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे सर्व करीत असताना कोविड-१९ च्या वैश्विक आपत्तीवर मात करण्याचे बळ आपल्या सामुहिक प्रयत्नांना मिळावे अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करते.

या वर्षीचा 'अर्घ्य' अंक आपल्या पसंतीला उतरेल असा विश्वास व्यक्त करते. या वार्षिकांकास शुभेच्छा!

**डॉ. वसुधा देव**
प्राचार्य
शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला

# संपादकीय मनोगत....



या वर्षीचा अर्घ्य वार्षिकांक कोविड योद्ध्यांना अर्पण करित आहोत. या पार्श्वभूमीवर शैक्षणिक सत्र २०१९-२० चा अर्घ्य वार्षिकांक आपणापुढे सादर करतांना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

शिक्षक प्रशिक्षणार्थींच्या कलागुणांना वाव देणारे व्यासपीठ म्हणजे अर्घ्य चा हा वार्षिकांक. भाषिक कौशल्यांचा पुरेपूर वापर करून शब्दांच्या माध्यमातून विचारांना मूर्त रुप देण्याचे काम या अर्घ्य वार्षिकांकामध्ये छात्राध्यापकांनी केले आहे. हा वाङ्मयीन दस्तएवज आपल्या हाती सोपवतांना मनापासून आनंद होत आहे.

या वर्षीच्या वार्षिकांला मूर्त रुपात साकार करण्याची जबाबदारी अर्घ्य मंडळ सचिव कु. मंजुषा तेलगोटे, श्री. आकाश रावत तसेच संपादक मंडळ सदस्य कु. अश्विनी जोशी, कु. प्रणोती गेडाम कु. श्वेता दुबे, श्री. प्रशांत मंडासे या सदस्यांनी अत्यंत समर्थपणे सांभाळली. त्याबद्दल ते अभिनंदनास व कौतुकास पात्र आहेत. अर्घ्य वार्षिकांक पूर्णत्वास नेण्यास ज्यांचे सहकार्य लाभले त्यामध्ये महाविद्यालयाचे मा. प्रभारी प्राचार्य डॉ. वसुधा देव यांची प्रेरणा व मार्गदर्शन महत्त्वपूर्ण आहे. त्याबद्दल मी त्यांच्या प्रति ऋण व्यक्त करते. माझे सहकारी प्राध्यापक भगिनी व कार्यालयीन कर्मचारी वर्ग यांच्या मोलाच्या सहकार्याबद्दल त्यांच्याप्रति आभार व्यकत करते तसेच प्रशिक्षणार्थी मित्रमैत्रीणींनी आमच्या आव्हानांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्याबद्दल त्यांचे आभार मानते. अर्घ्य वार्षिकांकाला सुंदर आकर्षक रुप देण्याचे काम गणराया ग्राफीक्सचे संचालक कुंदन बोरकुटे यांनी पुर्ण केले त्यांच्या प्रति आभार. प्रशिक्षणार्थींच्या भाषिक सृजनशिलतेला आविष्कारीत करणारा हा अर्घ्य वार्षिकांक वाचकांना मनस्वी आनंद देणारा ठरून सदर अंकास वाचकांचा भरभरून प्रतिसाद मिळेल असाा सार्थ विश्वास आहे.

**डॉ. आशा म. धारस्कर-भावसार**
संपादक, अर्घ्य वार्षिकांक

# संपादक सचिव मनोगत....



''आवड आणि आत्मविश्वास असेल
तर....
कोणतीही गोष्ट अवघड नाही!''

विद्यार्थी-जीवन हा एक उत्स्फूर्त प्रवास असतो. यामध्ये विविध अनुभव येतात. शिक्षण घेतांना प्रयत्न वादासोबतच छात्राध्यापकांच्या कला, त्यांचे लेखन, त्यांच्या कल्पना आणि भावना येथे जपल्या जातात. याच अनुषंगाने शासकीय अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापकांसाठी दरवर्षी अर्घ्य छात्राध्यापकांच्या अंतर्मनाला व्यक्त करण्यासाठी असलेलं हक्काचं शब्दरुप व्यासपीठ होय.

अर्घ्यमध्ये छात्राध्यापकांनी विविध विषयांवर लेख कथा, कविता व चारोळी लिहिल्या आहेत. मराठी, हिंदी, इंग्रजी अशा भाषांची संगत 'अर्घ्य' मध्ये दिसते. २०१९-२१ च्या या वार्षिकांकाला भरभरून प्रतिसाद द्यावा.

शासकीय अध्यापक महाविद्यालयाचे आधारस्तंभ प्रभारी प्राचार्य डॉ. वसुधा देव मॅडम व अर्घ्य वार्षिकांक प्रभारी तथा संपादक प्रा. डॉ. आशा धारस्कर मॅडम यांच्या वेळोवेळी मिळालेल्या मार्गदर्शनाने अर्घ्य विशेषांक २०१९-२० आकारास आलेला आहे. तसेच छात्राध्यापकांच्या वाङमयीन साहित्यामुळे या वार्षिकांकाला अर्थ प्राप्त झाला आहे. या सर्वांचे मी मनापासून ऋण व्यक्त करते आणि अर्घ्य वार्षिकांक २०१९-२० समस्त वाचकांच्या समक्ष अर्पण करते.

**कु. मंजुषा तेलगोटे**
संपादक मंडळ, सचिव
बी.एड. द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थी

# संपादक सचिव मनोगत....



वाचनाने ज्ञान वाढते,
सभेत बोलल्याने माणूस हजरजबाबी होतो,
मात्र लिहिण्याने माणसाचा विचार नेटका व काटेकोर होतो.

प्रत्येक व्यक्तीला आपल्या मनातलं लिहिता यावे यासाठी एखादं हक्काच पेज हवं असतं की ज्यामध्ये ते हक्काने त्यांच्या मनातील भावना व्यक्त करू शकतील. याच अनुषंगाने शासकीय अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापकांसाठी दरवर्षी 'अर्घ्य' वार्षिकांक प्रकाशीत करण्यात येतो. यामागचा हेतु म्हणजे विद्यार्थ्यांला आपले मत स्पष्ट मांडता येणे हा होय. विद्यार्थ्यांना लिहिण्याची आवड असते परंतु लिखाणाला प्रोत्साहन मिळत नाही, यासाठीच या अर्घ्य वार्षिकांकाचे प्रयोजन करण्यात येत.

अर्घ्य वार्षिकांकासाठी अनेक छात्राध्यापकांनी आपल्या लेखनातून आपले विचार व्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तर काही छात्राध्यापकांनी आपल्या भावना कवितेच्या स्वरुपात मांडल्या आहेत. वाचकांनो या साहित्याचा आस्वाद घेतांना तुम्हाला नक्कीच आनंद मिळेल आणि हा वार्षिक अंक आपल्या पसंतीस उतरेल अशी खात्री आहे. छात्राध्यापकांना साहित्य निर्मितीसाठी गुरुवर्यांकडून अनमोल असे मार्गदर्शन लाभले. त्यामुळेच छात्राध्यापक साहित्य निर्माण करू शकले. गुरूवर्यांच्या, कर्मचाऱ्यांच्या व छात्राध्यापकांच्या मदतीने हा वार्षिकांक प्रकाशित झाला आहे. सर्व वाचकांना या वार्षिकांकाला भरभरून प्रतिसाद द्यावा हीच कामना आहे.

शासकीय अध्यापक महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा. डॉ. वसुधा देव मॅडम आणि प्रा. डॉ. आशा धारस्कर मॅडम यांच्या अमुल्य मार्गदर्शनाने अर्घ्य वार्षिकांक २०१९-२० साकार झाला आहे. महाविद्यालयातील गुरुवर्य व छात्राध्यापकांच्या योगदानाने या वार्षिकांकास मोलाची मदत लाभली आहे. मी मनापासून त्यांच्या प्रति ऋण व्यक्त करतो व समस्त वाचकांच्या हाती हा वार्षिकांक सुपूर्त करतो.

**आकाश चंद्रकांत रावत**
संपादक मंडळ सचिव
बी.एड्. द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थी

## संपादक मंडळ



**प्रेरणास्थान**

डॉ. वसुधा वि. देव , प्राचार्य

संपादक : डॉ. आशा म. धारस्कर

अर्घ्य मंडळ सचिव : कु. मंजुषा तेलगोटे, आकाश रावत

✲ सदस्य ✲

श्वेता दुबे, प्रणोती गेडाम, प्रशांत मंडासे, अश्विनी जोशी

## द्वितीय वर्ष विद्यार्थी संसद



**डॉ. वसुधा वि. देव, प्राचार्य**

✲ मार्गदर्शक ✲

**डॉ. अर्चना ग. वातकर, डॉ. आशा म. धारस्कर**

विद्यापीठ प्रतिनिधी : **सुनिल मस्की**, महिला प्रतिनिधी : **कु. आम्रपाली मनवर**

विद्यार्थी प्रतिनिधी : **श्री. चेतन इंगळे**, सांस्कृतिक प्रतिनिधी : **कु. अश्विनी पुसरकर**

क्रीडा प्रतिनिधी : **अंकुश वाणे**

# प्रथम वर्ष विद्यार्थी संसद



※ प्रेरणास्थान ※

**डॉ. वसुधा वि. देव, प्राचार्य**

※ मार्गदर्शक ※

**डॉ. अर्चना ग. वातकर, डॉ. आशा म. धारस्कर**

विद्यापीठ प्रतिनिधी : **श्री. विकास खंडारे**, महिला प्रतिनिधी : **कु. स्नेहा उजवणे**

विद्यार्थी प्रतिनिधी : **श्री. प्रफुल्ल शेळके**, सांस्कृतिक प्रतिनिधी : **विशाल बुंदेले**

क्रीडा प्रतिनिधी : **आकाशसिंग नरवैय्या**

# बी. एड्. प्रथम वर्ष प्रशिक्षणार्थी



# यशाचे शिल्पकार



प्राचार्य:
**डॉ. वसुधा विनोद देव**
एम. कॉम. एम.ए. (अर्थ)
एम. ए. (मराठी विषय संप्रेषण) एम. एड्, पीएच. डी. (शिक्षण)
सेट (शिक्षण), डी. आय. टी.



**डॉ. रोहिणी विकास तडस**
एम. एस्सी (रसायन), एम. एस्सी.
(विषय संप्रेषण), एम. एड्., हिंदी पंडीत
पीएच. डी. (शिक्षण), सेट (शिक्षण)



**डॉ. आशा मधुकर धारस्कर**
एम. ए. (इति, समाजशास्त्र, मराठी)
एम. ए. विषय संप्रेषण (शिक्षणशास्त्र)
एम. एड्, एम. फिल, (दुरशिक्षण),
पीएच. डी.(शिक्षणशास्त्र), डी. बी. सी. एम.



**डॉ. अर्चना गणेशराव वातकर**
एम. एस्सी (गणित), एम. एस्सी. (मूल्यशिक्षण व अध्यात्मिकता),
एम. एड्, पीएच. डी. (शिक्षणशास्त्र)



**डॉ. संध्या उद्धव सामुद्रे**
बी. एस्सी (गणित), बी. ए. (इंग्रजी वाड्‌मय)
एम. एस्सी. (विषय संप्रेषण), एम. ए. (समाजशास्त्र)
एम. एड्, पीएच. डी. (शिक्षण)

# यशाचे वाटेकरी

## कार्यालयीन कर्मचारी




**डॉ. संकेत श्रीकृष्ण राऊत**
ग्रंथपाल



**श्री. अनिल रावसाहेब तरारे**
मुख्य लिपीक



**श्री. रामेश्वर विश्वनाथ वाणे**
वरिष्ठ लिपिक



**श्री. गणेश मनोहर पाठक**
कनिष्ठ लिपिक



**श्री. राजेश अजाबराव पडोळे**
प्रयोगशाळा सहाय्यक

## चतुर्थ श्रेणी कर्मचारी



**श्री. अनिल शिवाजी वानखडे**
शिपाई



**श्री. राजु सुरजदीप यादव**
शिपाई

**श्री. रवि अंबुजी देनवाल**
शिपाई



**श्री. गजानन रामकृष्ण ठाकरे**
शिपाई

# क्षणचित्रे



स्वच्छता अभियानात सहभागी विद्यार्थी



स्वच्छता अभियानात प्राध्यापकांचा व
मा. प्राचार्य डॉ. वसुधा देव यांचा सहभाग



स्वच्छता अभियानात सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक



स्वच्छता अभियानात प्राध्यापकांचा सहभाग



सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी



शैक्षणिक साहित्य प्रदर्शनीचे निरीक्षण करतांना
प्राचार्य डॉ. राजेंद्र मानेकर

# क्षणचित्रे



SUPW कार्यशाळेत प्रशिक्षणार्थी वॉलपेंटींग करतांना



प्राचार्य डॉ. राजेंद्र मानेकर यांच्या सेवानिवृत्तीनिमीत्त आयोजित निरोप समारंभ



सावित्रीबाई फुले कन्या शाळेत छात्रसेवाकाळ अंतर्गत गीतगायन करतांना विद्यार्थी



प्राचार्य डॉ. राजेंद्र मानेकर यांच्या सेवा निवृत्ती निरोप समारंभात डॉ. शांतारामजी बुटे यांच्या हस्ते स्वागत



पोस्टर स्पर्धा



शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा

# क्षणचित्रे



जागृती विद्यालय येथे छात्रसेवाकाळ दरम्यान उपस्थिती समन्वयक तथा गट प्राध्यापक डॉ. आशा धारस्कर व शाळेतील शिक्षकवृंद



योग कार्यशाळेत श्री. अरविंद जोध (योग प्रशिक्षक) यांचे स्वागत करतांना डॉ. रोहिणी तडस (समन्वयक)



प्रभात किडस् स्कूल, अकोला येथे छात्रसेवाकाळ समारोप प्रसंगी उपस्थित शाळेचे संस्थापक डॉ. गजानन नारे, प्राचार्य, डॉ. वसुधा देव व समन्वयक डॉ. धारस्कर



प्रभात किड्स स्कुल येथे छात्रसेवाकाळ प्रसंगी मा. वंदना नारे यांचे पुस्तक देऊन स्वागत करतांना डॉ. आशा धारस्कर



मनुताई कन्या शाळा येथे छात्रसेवाकाल उपक्रमा प्रसंगी उपस्थित डॉ. अर्चना वालकर, व पर्यवेक्षकांचे स्वागत करतांना बी.एड प्रशिक्षणार्थी



मनुताई कन्या शाळा येथे मुख्याध्यापिका सौ. वर्षा पाठक, उपमुख्याध्यापक व गट प्राध्यापक डॉ.संध्या सामुद्रे, सोबत प्रशिक्षणार्थी

# क्षणचित्रे



कौशल्य विकास कार्यशाळा अंतर्गत उपक्रमात
सहभागी विद्यार्थी, मार्गदर्शक - डॉ. आशा धारस्कर



कौशल्य विकास कार्यशाळा अंतर्गत उपक्रमात
सहभागी विद्यार्थी, मार्गदर्शक - डॉ. आशा धारस्कर



कौशल्य विकास कार्यशाळेत 'वेळेचे व्यवस्थापन'
या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. आशा धारस्कर



कौशल्य विकास कार्यशाळेत प्रा. सोनल कामे
शाब्दिक संप्रेषण या विषयावर मार्गदर्शन करतांना



कौशल्य विकास कार्यशाळा शाब्दिक संप्रेषण : डॉ. सोनल कामे
समन्वयक : डॉ. आशा धारस्कर व विद्यार्थी विकास अधिकारी
डॉ. रोहिनी तडस



पदवी वितरण समारंभास प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित
श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एम. भिसे
यांचे स्वागत करतांना मा. प्राचार्य डॉ. वसुधा देव

# क्षणचित्रे



सावित्रीबाई फुले जयंती निमित्त एक नाटीका



स्वच्छता अभियान रॅलीत सहभागी प्रशिक्षणार्थी,
प्राचार्य, प्राध्यापक वृंद व कर्मचारी वर्ग



स्वच्छता अभियान अंतर्गत स्वच्छता संदेश देतांना विद्यार्थी



गांधी विचार संस्कार परिक्षा २०१९ च्या यशस्वी
आयोजनाबाबत समन्वयक डॉ. आशा धारस्कर यांचा सत्कार



गांधी विचार परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यी
प्रमाणपत्र स्विकारतांना



गांधी विचार परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यी
प्रमाणपत्र स्विकारतांना

# क्षणचित्रे



प्रजासत्ताक दिनानिमीत्त देशभक्तीपर गीत सादर करतांना बी.एड प्रशिक्षणार्थी



शैक्षणिक निर्मिती कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मा. प्राचार्य डॉ. वसुधा देव



प्रजासत्ताक दिनाच्या उपस्थित प्रशिक्षणार्थी व प्राध्यापक वृंद



शैक्षणिक निर्मिती कार्यशाळेचे परिक्षण करतांना मा. प्राचार्य डॉ. वसुधा देव व प्राध्यापक



सामाजिक उपक्रमांतर्गत अंध विद्यालयास क्षेत्र भेट बी.एड. प्रशिक्षणार्थी व समन्वयक डॉ. रोहिणी तडस



सामाजिक उपक्रमांतर्गत अंध विद्यालयातील विद्यार्थी गीत सादर करतांना

# क्षणचित्रे



आचार्य पदवी (पीएच.डी.) कोर्स वर्क २०२०
उद्घाटन कार्यक्रम



मा. प्राचार्य डॉ. वसुधा देव आचार्य पदवी (पीएच.डी)
कोर्स बाबत मार्गदर्शन करतांना



माजी विद्यार्थी मेळाव्यास उपस्थित
माजी विद्यार्थी व प्राध्यापकवृंद



अंमित पाठ परीक्षा २०२० च्या आयोजन
प्रसंगी उपस्थित बहिस्थ परीक्षक



माजी विद्यार्थी मेळावा प्रसंगी प्रमुख अतिथी डॉ. गजानन नारे
यांचे स्वागत करतांना प्राचार्य डॉ. वसुधा देव



प्रमुख अतिथी डॉ. गजानन नारे माजी विद्यार्थी
मेळाव्याचे उद्घाटन करतांना

# क्षणचित्रे



छात्र संसद सभेत प्राचार्य डॉ. वसुधा देव मार्गदर्शन करतांना समन्वयक डॉ. अर्चना वातकर



विज्ञान दिन कार्यक्रमास उपस्थित मान्यवर व समन्वयक डॉ. रोहिणी तडस



मराठी भाषा दिन निमित्त उपस्थित मान्यवरांचे स्वागत करतांना प्राचार्य डॉ. वसुधा देव



स्व:आकलन कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना



छात्रसंसद सभेत उपस्थित संसद प्रतिनिधी व प्राध्यापक डॉ. आशा धारस्कर व डॉ. संध्या सामुद्रे



अंतिमपाठ परीक्षा २०२० मा. प्राचार्य डॉ. वसुधा देव यांचे स्वागत करतांना समन्वयक डॉ. आशा धारस्कर

# ✻ अनुक्रमणिका ✻


| अ.क्र. | विवरण | पृष्ठ |
|---|---|---|
| | **मराठी विभाग** | |
| १. | **नाती**<br>मुक्ता सं. मराठे | ३ |
| २. | **प्रेम म्हणजे काय असतं**<br>कु. ऐश्वर्या अविनाश गवई | ३ |
| ३. | **मित्र कोणाला म्हणायचे**<br>वैशाली श्री. उगले | ३ |
| ४. | **विद्यार्थी नापास होणार की पास ?**<br>रविंद्र शिवहरी कोहळे | ४ |
| ५. | **प्रेरणादायी विचार**<br>रुपाली राखोंडे | ४ |
| ६. | **बाप**<br>प्रशांत भानुदास मंडासे | ५ |
| ७. | **बोधकथा**<br>मनिष गजानन चव्हाण | ६ |
| ८. | **सौंदर्य म्हणजे काय ?**<br>कु. प्रिती ज्ञानेश्वर चुडे | ६ |
| ९. | **परिभाषा सौंदर्याची**<br>कु. अश्विनी जोशी | ७ |
| १०. | **सुविचार**<br>मनिष ग. चव्हाण | ७ |
| ११. | **सुविचार**<br>मेघा नारायण धनोकार | ७ |
| १२. | **सुविचार**<br>कु. ममता संजय लंगे | ७ |
| १३. | **जननी**<br>कु. निकीता दिलीप जाधव | ८ |
| १४. | **सखा अन गुरू सखा अन गुरू**<br>कु. निकीता दिलीप जाधव | ८ |
| १५. | **सुविचार**<br>आकाश रावत | ८ |
| १६. | **सुविचार**<br>कु. दिपाली सु. पवार | ९ |
| १७. | **लाडानं वाया गेलेलं पोर**<br>कु. दिपाली सु. पवार | ९ |
| १८. | **बाप**<br>मेघा नारायण धनोकार | १० |

१९. **स्त्री** १०
निर्मला महादेव भिसे
२०. **जीवनानुभव** १०
निर्मला महादेव भिसे
२१. **माझी कविता** ११
निर्मला महादेव भिसे
२२. **दुःखातले सुख** ११
निर्मला महादेव भिसे
२३. **आयुष्य** १२
अनुसया गणेश पाचपोर
२४. **बाप** १२
कु. प्रियंका रामराव जोगदंड
२५. **आई** १३
अश्विनी अंभोरे
२६. **विचीत्र पण सत्य** १३
अश्विनी अंभोरे
२७. **रक्तातलं वादळ** १४
कु. रुपाली राजेंद्र राखोंडे
२८. **बाबा** १५
धनश्री वसंतराव पतिंगे
२९. **चारोळी** १५
धनश्री वसंतराव पतिंगे
३०. **मैत्री** १६
मनोज टिकार
३१. **स्वप्नांना पंख आहेत उडते मी...** १६
अश्विनी अंभोरे
३२. **विझतो आज जरी मी** १७
आम्रपाली भि. मनवर
३३. **मैत्री** १७
कु. कांचन गोवर्धन वरोकार
३४. **पाऊस** १७
कु. कांचन गोवर्धन वरोकार
३५. **मन** १८
प्रियंका रामराव जोगदंड
३६. **शिक्षक म्हणजे** १८
ममता संजय लंके
३७. **सुविचार** १८
ममता संजय लंके
३८. **माय** १९
चंदा कैलास टिकार

| | | |
|---|---|---|
| ३९. | **वाट**<br>कु. कोमल माणिकराव इंगळे | १९ |
| ४०. | **ती**<br>प्रियंका रामराव जोगदंड | २० |
| ४१. | **मैत्री**<br>कु. ऐश्वर्या अविनाश गवई | २० |
| ४२. | **चारोळी**<br>संगिता विनोद उगले | २१ |
| ४३. | **नशीव**<br>कु. निकीता रामभाऊ उगले | २१ |
| ४४. | **कविता**<br>कु. ममता संजय लंके | २१ |
| ४५. | **चारोळी**<br>पुनम लुले | २१ |
| ४६. | **जागतिक पर्यावरण दिवस**<br>कु. पल्लवी प्रकाश काकडे | २२ |
| | **हिंदी विभाग** | |
| ४७. | **तू जिंदगी को जी**<br>श्वेता दुबे | २५ |
| ४८. | **सपनो में रख आस्था**<br>ऋतिका देशमुख | २५ |
| ४९. | **सपनो में रख आस्था**<br>ऋतिका देशमुख | २५ |
| ५०. | **मेरी प्यारी माँ की यादें**<br>नम्रता मुनीस | २६ |
| | **English** | |
| 51. | **Role of Teacher in Modern Sociology**<br>Vaishnavi P. Bhuibhar | 29 |
| 52. | **Your Best**<br>Nirmala Bhise | 30 |
| 53. | **Managing Learning Difficulties and Disorders**<br>Vidya S. Parakh | 31 |
| | **अहवाल विभाग २०१९-२०** | |
| १. | **वाचन-परावर्तित विषय वस्तू**<br>डॉ. वसुधा देव | ३५ |
| २. | **एसयुपीडब्ल्यू कार्यशाळा**<br>डॉ. वसुधा देव | ३६ |

| | | |
|---|---|---|
| ३. | **आय.सी.टी. कार्यशाळा**<br>डॉ. वसुधा देव | ३८ |
| ४. | **शालेय अनुबंध अहवाल**<br>डॉ. संध्या उद्धव सामुद्रे | ३९ |
| ५. | **पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ**<br>डॉ. संध्या उद्धव सामुद्रे | ४१ |
| ६. | **सांस्कृतिक कार्यक्रम अहवाल**<br>डॉ. रोहिणी तडस | ४३ |
| ७. | **परीक्षा विभाग अहवाल**<br>डॉ. संध्या उद्धव सामुद्रे | ४५ |
| ८. | **IQAC अहवाल**<br>डॉ. आशा धारस्कर | ४६ |
| ९. | **छात्रसेवाकाळ कार्यशाळा अहवाल**<br>डॉ. आशा धारस्कर | ४७ |
| १०. | **छात्रसेवाकाळ अहवाल**<br>डॉ. आशा धारस्कर | ४८ |
| ११. | **वेबिनार : ताणतणावेचे व्यवस्थापन**<br>डॉ. आशा धारस्कर | ४९ |
| १२. | **राष्ट्रीय चर्चासत्र अहवाल**<br>डॉ. आशा धारस्कर | ५० |
| | **अहवाल विभाग २०२०-२१** | |
| १३. | **शालेय अनुबंध अहवाल**<br>डॉ. संध्या उद्धव सामुद्रे | ५३ |
| १४. | **छात्र संसद अहवाल**<br>डॉ. अर्चना ग. वातकर | ५५ |
| १५. | **संविधान कार्यक्रम अहवाल**<br>डॉ. अर्चना ग. वातकर | ५६ |
| १६. | **अहवाल**<br>❊ पोस्टर स्पर्धा<br>❊ वाचन प्रेणा दिवस<br>❊ स्वच्छता पंधरवाडा २०२०<br>❊ माजी विद्यार्थी संघटना<br>❊ दिन विशेष हारार्पण अहवाल<br>डॉ. अर्चना ग. वातकर | ५७ |
| १७. | **शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा**<br>डॉ. अर्चना ग. वातकर | ६० |
| १८. | **एसयुपीडब्ल्यू कार्यशाळा**<br>डॉ. वसुधा देव | ६२ |
| १९. | **वाचन-परावर्तित विषय वस्तू**<br>डॉ. वसुधा देव | ६३ |

# मराठी विभाग

## नाती

स्वत:साठी सर्वच जगतात
कधी इतरांसाठी जगून पाहावं,
आयुष्यात एकदा कुणासाठी तरी
सारं जग विसरुन पाहावं,
स्वत:साठी सर्वच जगतात कधी
इतरांसाठी जगून पहावं ।।१।।

मी, माझं, माझ्यासाठी इतकचं नसतं आयुष्य
नात्यामधील तो उत्कट भाव एकदा तरी उमगून पाहावं
स्वत:साठी सर्वच जगतात कधी इतरांसाठी
जगून पहावं ।।२।।
खूप सौख्यात जगले असाल
कधी स्वत:च्याच दु:खात दु:खी असाल
एकदातरी कुणासाठी डोळे अश्रूंनी भरुन पहावं
स्वत:साठी सर्वच जगताता कधी इतरांसाठी जगून पहावं
।।४।।

कवयित्री
**मुक्ता सं. मराठे**

## मित्र कोणाला म्हणायचे ?

ज्याच्याजवळ मनातील भाव व्यक्त करतांना संकोच वाटत नाही, खोटे बोलावसे वाटत नाही, फसवावेसे वाटत नाही, पापपुण्याची कबुली देण्यास मन कचरत नाही, ज्याला आपला पराक्रम कौतुकाने सांगावसा वाटतो, ज्याच्याजवळ पराभवाचे शल्य उघडे करायला कमीपणा वाटत नाही, ज्याच्या सुखदुखाशी आपण एकरुप होऊ शकतो तो खरा मित्र. मित्र ही जीवनातील अत्यावश्यक गरज आहे. मन निकोप राहण्यासाठी, कर्तृत्वाला प्रोत्साहन मिळण्यासाठी मित्र हवाच.....

**वैशाली श्री.उगले**, बी.एड.भाग २

## प्रेम म्हणजे काय असतं....

प्रेम म्हणजे काय असतं
चातकाला पावसाशी असतं
टपोऱ्या दवबिंदूला
गवताच्या पात्याशी असतं...

प्रेम म्हणजे काय असतं
जे चंद्राला चांदण्यांशी असतं
इंद्रधनुष्याला क्षितीजाशी असतं
सळसळणाऱ्या वाऱ्याला गर्जणाऱ्या ढगांशी असतं

प्रेम म्हणजे काय असतं
जे फुलपाखराला फुलांशी असतं
काजव्याचे घनदाट अंधाराशी असतं
गुणगुणणाऱ्या पतंगाला मिणमिणत्या दिव्यासाठी असावं

प्रेम म्हणजे काय असतं..
हसण्याला रडण्याशी असतं
सुखाला दु:खाशी असतं
रात्रीच्या अंधाराला सकाळच्या उजेडाशी असतं

प्रेम म्हणजे काय असतं
जे हळुवार जपायचं असतं
ह्रदयात साठवून ठेवायचं असतं
कितीही दु:ख झाल तरी हसत जगायचं असतं

प्रेमम म्हणजे काय असतं..
जे फक्त शेवटपर्यंत
तिच्यात आणि आपल्यात असतं
त्याच्यात आणि आपल्यात असतं.

**कु.ऐश्वर्या अवीनाश गवई**

## विद्यार्थी नापास होणार की पास ?

वर्षाचे एकूण दिवस ३६५
३५ दिवस दिवाळी आणि नाताळची सुट्टी
उरले दिवस ३३०
५० दिवस उन्हाळ्यात सुट्टीत जातात
उरले २८० दिवस
एका वर्षात एकूण ५२ रविवार असतात.
उरले २२८ दिवस
विद्यार्थी आठ तास झोपतो म्हणजे
वर्षातून १२२ दिवस झोपतो.
उरले १०६ दिवस
कपडे बदलणे आंघोळ, जेवण यामध्ये
दररोज अडीच तास जातात म्हणजे
३८ दिवस, उरले ६८
खेळासाठी दररोज १ तास म्हणजे
१५ दिवस ,उरले ५३ दिवस
आजारपण, यात्रा, कार्यक्रम यासाठी
१० दिवस, उरले ४३ दिवस
सणासाठी वर्षातून १५ दिवस सुट्टी ,
उरले २८ दिवस
टि.व्ही.पाहणे यासाठी किमान १ तास
म्हणजे १५ दिवस, उरले १३ दिवस
परीक्षा १२ दिवसांची, उरला १ दिवस
आणि तो ही दिवस निकाल पाहण्यात जातो ?
मग तुम्हीच सांगा विद्यार्थी नापास होणार की पास

**रविन्द्र शिवहरी कोहळे**

बी.एड्. द्वितीय

## प्रेरणादायी विचार

हरलो म्हणून थांबू नको, युध्द अजून संपले नाही, जिंकण्याची आस मनी ठेव,तू अजून जिंकलेला नाहीस,काही केल्याशिवाय जयजयकार सुध्दा होणार नाही, मग सांग स्वतःला खंबीरपणे मी जिंकल्याशिवाय राहणार नाही. आयुष्याच्या एका टप्प्यावर प्रत्येकाला दोन बाबींची गरज असते. पहिले म्हणजे आयुष्यात प्राधान्यक्रम ठरवीता आले पाहिजे आणि दुसरे म्हणजे ठरविलेले प्राधान्यक्रम प्राप्त करण्यासाठी गांभीर्याने प्रयत्न करायला पाहिजे. कोणत्याही गोष्टीसाठी प्रथम ज्ञान, बुध्दी मग कल्पना विचार मग आराखडा आणि नंतर अथक प्रयत्नाने यशप्राप्ती होते.

**लढाई जिंकण्यासाठीची सूत्रे**

भरपूर कष्ट करा, स्वतःवर विश्वास ठेवा, कोणताही नकारात्मक विचार करू नका आत्मविश्वास सातत्यपूर्ण प्रयत्न आणि क्षमतावृध्दी या त्रयींच्या आधारे आयुष्यातील कोणतीही लढाई तुम्ही जिंकू शकता.

**आयुष्याविषयी**

आयुष्यातील प्रत्येक दिवसाला आनंदाने सामोरे जा. तो दिवस मावळतांना तुम्हाला भरभरून असं काही तरी देईल. प्रत्येक क्षणाचा आनंद लुटा, कारण दिवस तरी परत उगवेल परंतु तो आनंदाचा क्षण पुन्हा कधीच येणार नाही. तुम्ही हसा इतरांना हसवा. तुम्ही जिंका इतरांना सुध्दा जिंकण्यासाठी प्रेरित करा.

**रुपाली राखोंडे**

बी.एड्. द्वितीय

# बाप

बाप म्हणजे कसा जसा पाण्यातला मासा
त्याच्या डोळ्यातला थेंब कोणा दिसणार कसा
बाप साठवतो अश्रू वाट पाही त्या क्षणाची
जन्म भराचे रडतो लेक जातांना सासरी
ज्याने जपले मुलांना तळहाती पाळण्यात
अशा बापासाठी यावी थोडी आसवे डोळ्यात....

वरील ओळी जेव्हा वाचल्या तेव्हा कळलंच नाही शब्द कविता बनून बाहेर पडले की मनात बापांचे असलेले प्रतिबिंब उमटले किंवा कविता बनून बाहेर पडले. श्रीकृष्णाला देवकीने जन्म दिला यशोदेने पोषण केले पण भर पावसात श्रीकृष्णाला आणलेल्या वासुदेवाला मात्रा आपण विसरलो. राम हा कौसल्येचा पुत्र असला तरी पुत्र शोकाने मात्र राजा दशरथच मरण पावला. या बापाला आपण कसं विसरु शकतो हे फार कमी लोकांना माहीती आहे.

बापाचं प्रेम कधी दिसुन येत नाही म्हणतात ना एखादी गोष्ट जोपर्यंत आपल्या जवळ असते तोपर्यंत तिची किंमत नसते, खरी किंमत दूर गेल्यावर कळते. आयुष्यात बाप हा मित्रासारखा असावा कारण त्याच्याकडे काहीही बोलतांना मनात संकोच नसावा.

मी आज हे लिहतोय म्हणजे मला त्या बापाची कदर होती असं नाही, ती मला त्या बापाला गमावल्यावर कळली. कधीतरी एकेकाळी मित्रांचा फोन आला तर बाबांच्या फोनाला होल्ड वर ठेवून नंतर त्याच्याशी बोलायचो आता मित्र सोबत आहेत पण मात्र बाबांनी फोन होल्डवर ठेवलाय. बाबाशी बोलायचं खुप आहे पण वेळ आता सोबत नाहीये. आयुष्याच्या प्रत्येक संघर्षामध्ये माझे बाबा सोबत आहेत या जाणीवेनेच त्या संघर्षाचा अंत व्हायचा आता सोबत नाही आहेत याने संघर्षाची सुरुवात होते.

माझे बाबा मला नेहमी सांगायचे जीवन जगायचे असेल तर स्वत:च्या बळावर जग सरकारी नोकरीचे स्वप्न सोडून दे आणि तुझ्यातल्या गुणांना वाव दे. आज खुप साऱ्या प्रश्नांची उत्तरे मागावीशी वाटतात पण कोणाला मागावी कळत नाही कोणांवर एवढा अधिकार नाही.

आयुष्याच्या ज्या वळणावर मी उभा आहे आज खरंच मला माझ्या बाबांची गरज आहे. जेव्हा एखाद्या मित्राला त्यांच्या बाबा बरोबर बघतो. डोळ्यात हळुच ओलसर दवबिंदू उमटतात आणि डोळ्यांच्या पापण्यांना स्पर्श करुन जमिनीकडे झेप घेतात.

चटका बसला, ठेच लागली, फटका बसला तर आई ग हाच शब्द बाहेर पडतो, पण हायवे, रस्ता क्रॉस करतांना एखादा ट्रक जवळ येऊन अचानक ब्रेक लावतो तेव्हा मात्र बाप रे हेच शब्द बाहेर पडतात. कारण छोट्या संकटात आई चालते पण मोठया वादळांना पेलतांना बापच आठवतो. जेव्हा आयुष्यामध्ये संकटे येतात तेव्हा बाबा पाठीशी आहेत या धीरानेच अर्धी संकटे जिंकली जातात. पण वेळ मात्र आता तशी नाहीये कारण मी त्या व्यक्तीला कधीच गमावलंय. आयुष्यभर न पेलावणारी व न भरणारी जखम मनाला लागलीये. माझ्या बाबांच्या शेवटच्या क्षणाला सुध्दा मी कधीच विसरु शकत नाही जीवनाचे आयुष्याचे काही मिनिटे आपल्याकडे उरली असतांनाही ते माझाच विचार करत होते. आयुष्यात मला कोणासारखं बनायचं असेल तर माझ्या बाबा सारखं. ज्यांनी चालवणं शिकवलं पण जगायचं कसं हे शिकवायची वेळ आली तर तो व्यक्ती आता सोबत नाही आहे. प्रत्यक्षरित्या सोबत नसला तरी मनाने तो माझ्या नेहमीसोबत आहे आणि असणार आहे.

**प्रशांत भानुदास मंडारे**
बी.एड.व्दितीय (स्वरचीत)

## बोधकथा

समुद्र किनाऱ्यावर जेव्हा लाट आली, तेव्हा जाताना एक लहान मुलगी एक चप्पल आपल्यासोबत घेऊन गेली... ती मुलगी वाळूवर बोटाने लिहते की, समुद्र चोर आहे .त्याच समुद्राच्या दुसऱ्या तटावर मासे पकडणारा खूप मासे पकडतो. तो वाळूवर लिहतो की, समुद्र पालनकर्ता आहे. एक युवक समुद्रात बुडून मरण पावतो तेव्हा त्याची आई वाळूवर लिहते, समुद्र खुनी आहे. एक दुसऱ्या किनाऱ्यावर एक गरीब वृध्द वाकड्या कंबरेने फिरत असतो त्याला एक मोठ्या सीपमध्ये एक अनमोल मोती सापडतो तर तो वाळूवर लिहतो, समुद्र दाता है, अचानक एक विशाल लाट येते आणि सर्व लिहीलेले पुसले जाते.

लोक काही म्हणू द्या... परंतु अथांग, विशाल समुद्र आपल्या लाटांमध्ये मस्त राहतो. आपली भरती ओहोटी तो आपल्या पध्दतीने घडवित असतो. जर अथांग समुद्र बनायचे असेल तर कोणाच्या निर्णयावर लक्ष न देता जे करायचे ते आपल्या पद्धतीने करायचे... भूतकाळातील विचार करत बसू नये, यश अपयश, मिळणे न मिळणे, सुख-दुःख या सगळ्यात मन विचलीत होउ देऊ नये जर जीवन सुख शांतीने भरलेले असते तर मनुष्य जन्माला येतांना रडला नसता. जन्माला येतांना रडणे आणि मेल्यानंतर रडवणे यामधील संघर्षमय वेळेलाच कदाचित जीवन म्हणतात.

**मनीष गजानन चव्हाण.**

बी.एड.भाग २

## सौंदर्य म्हणजे काय?

तुम्ही शिक्षक आहात तर, तुमचं सौंदर्य फळ्यावर नीटपणे लिहीलेल्या अक्षरात असेल. विषयाचं आकलन झाल्यावर दिसणारे विद्यार्थ्यांचं समाधान आनंदी चेहरे, ही तुमचीच सुंदरता आहे. सौंदर्य कपड्यात नाही, कामात आहे.

सौंदर्य नटण्यात नाही, विचारांमध्ये आहे. सौंदर्य भपक्यात नाही, साधेपणात आहे. सौंदर्य बाहेर कशात नाही तर मनांत आहे.

आपण करीत असलेलं प्रत्येक काम म्हणजे सौंदर्याचं सादरीकरण असतं. आपल्याला आपल्या कृतीतून सौंदर्याची निर्मिती करता आली पाहिजे. प्रेमानं बोलणं म्हणजे सुंदरता....।। आपलं मत योग्य रितीने व्यक्त करता येणं म्हणजे सुंदरता...

नको असलेल्या गोष्टीला नकार देण्याची हिंमत म्हणजे सुंदरता... दुस-याला समजावून घेणं म्हणजे सुंदरता...।।

आपल्या विचारातून आपल्या वर्णनातून आपलं सौंदर्य बाहेर आलं पाहिजे. हाती आलेला प्रत्येक क्षण रसरशीतपणे जगण्यात, कामात कौशल्य प्राप्त झालं की, आपोआपच आत्मविश्वास वाढतो, आत्मसन्मानाची जाणीव म्हणजे सौंदर्य....

**कु.प्रीती ज्ञानेश्वर चुडे**

बी.एड.भाग २

# परिभाषा सौंदर्याची

स्वप्रतिष्ठा जीवन कौशल्याच्या विकसनाचा दुसरा टप्पा आहे. तो म्हणजे स्वत:ला सुंदर मानण्याचा. तुम्ही सुध्दा इतरांप्रमाणेच सुंदर आहात, साइज झीरो म्हणजेच सौंदर्य नसतं, तुमचं स्थूल असणं, सावळा रंग असणं, यापेक्षा लोक तुम्हाला एक चांगली व्यक्ती म्हणून मानतात. नुसत्या सुंदर दिसण्यानं तुमचं आयुष्यातलं मोल वाढत नसतं. तुमच्या हृदयात अनेक सुंदर गोष्टी असतात, त्या शोधायच्या असतात. तुम्ही चांगले आहात असं जेव्हा मित्र, घरातले, बाहेरचे लोक म्हणतात किंवा लाघवी व्यक्तिमत्वाचे आहात, तुमच्या सहवासात प्रसन्न, शांत, सुरक्षित वाटतं, असं जेव्हा म्हणतात ते असतं सौंदर्य.

कारण इतर लोक आपल्याकडे ज्या नजरेने पाहतात त्या दृष्टीने आपण स्वत:कडे कधीच पाहत नसतो.

**संकलन – कु. अश्विनी जोशी**, बी.एड.भाग २

---

## सुविचार

चांगल्या माणसांची संगत
आणि यशस्वी व्यक्तिंचे मार्गदर्शन
आपल्या जीवनात निश्चितच
प्रेरणादायी बदल घडवू शकतो.
म्हणूनच जीवनात जर चांगली
आणि यशस्वी माणसे भेटली तर
त्यांच्याशी जरुर मैत्री करावी.
यशस्वी आयुष्यापेक्षा
समाधानी आयुष्य केव्हाही चांगलं
कारण...
यशाची व्याख्या लोक ठरवतात.
आणि समाधानाची व्याख्या
आपण स्वत: सिध्द करतो.

**संकलन**
**मनीष ग.चव्हाण**
बी.एड.भाग २

## सुविचार

आयुष्याचे नियोजन दमदार असूद्या
तेव्हाच आयुष्य रुबाबदार जगता येईल
जगण्याचा आनंद हा आपल्या
अवती भवतीच असतो फक्त
त्याला शोधता आलं पाहिजे
आयुष्यात कोणतीही व्यक्ती आनंदी
होउ शकत नाही जो पर्यंत तो
स्वत:ला आनंदी मानत नाही.
स्वरचित,
**मेघा नारायण धनोकार**
बी.एड.भाग २

## सुविचार

पोटापाण्याचा उद्योग तुम्हाला जगवील, पण
कलेशी जमलेली मैत्री तुम्ही का जगायचं हे सांगून जाईल.
आयुष्य हे असंच असतं ते फक्त सोसायचं असतं
जीवनाच्या वाटेवर येणार असतं आयुष्य हे
असंच असतं ......
स्वरचीत- **कु.ममता संजय लंके** (B.Ed.II Year)

## जननी

धन्य जाहली उदरी तिच्या येऊनी
पंखात घातली वात्सल्याची सावली
संस्कारातूनी घडवली आयुष्याची संगिनी
उडता आकाशी पण नको विसरू धरणी
घेतला वसा नको टाकू फुंकूनी
शिलवान, गुणवान मनी रुजवनी
धर्माच्या वाटेवर चालावे सत्य जाणूनी
तुझी शिकवण मज दिशा उमगूनी
मार्ग क्रमीते मी सान होऊनी
आज मी जानते तुला माय होऊणी
तुज परी नाही मी जननी
देते तुझी शिदोरी पिल्लांना बांधूनी
फेडू कसे ऋण तुझे अजूनी
आज लेखणीत मी उतरनी
तुला धन्यते शब्दांच्या चांदण्यातुनी

**कु. निकीता दिलीप जाधव**
बी.एड. व्दितीय वर्ष

## सखा अन गुरु सखा अन गुरु

हयात अंतर काहीच नाही
सखा असतो सोबतीला, गुरु वाट दाखवायला
सखा म्हणतात सोबत्याला, सुख दुःखाच्या सिलसिला
गुरु मार्ग दाखवायला शिकवितो ओळख प्रहाराला
सख्या संसाराच्या जोडीला, आदर्श बनवितो प्रपंचाला
गुरु जन्मो जन्मीच्या प्रवासाला,
नेतो प्रकाशमय वाटेला, कर्मच बनवीतात मानवाला
पुढचा प्रवास काय जाहला, जुळवतात बंध नात्याला
जाणीव होते मग सोबत्याला, सखा अन गुरुला.
नसतात तोलत एकाला
मार्गा प्रत सत्याला न्यायचे असते दोघाला,
म्हणून जाणवले मला, सखा अन गुरु
एकच जाहला

**कु. निकीता दिलीप जाधव**
बी.एड. व्दितीय वर्ष

वादळात पत्यांचं घर बनत नाही, रडल्याने बिघडलेले नशीब बनत नाही
जग जिंकण्याची हिम्मत ठेवा, एकदा हरल्याने कुणी फकीर होत नाही
आणि एकदाच जिंकल्याने कुणी सिकंदर होत नाही
लबाडीने जिंकण्यापेक्षा तत्त्वाने हारलेले बरे,
कुणी विचारले हरला कसा तर सांगेन मी लढलो कसा...

**आकाश रावत**
बी.एड. व्दितीय वर्ष

## सुविचार

पैसाला वळण लावण्यापेक्षा
बुध्दीला वळण लावावे
अन्नदानापेक्षा विद्या दानाचे महत्त्व अधिक आहे
पुन्हा पुन्हा चुकण्यासाठी
आपण नेहमी चुका करतो
आणि भान हरवून बसतो
आपल्या रिकाम्या जागा आपल्याला
फार काही शिकवीत असतात
छोट्याशा चुकीलाही
आभाळाएवढी शिक्षा असते
चूक आणी शिक्षा याची कधी
मोजणी करायची नसते
शेवटी हे सगळं घडत
फक्त आपण काही शिकण्यासाठी
आपण मात्र शिकत असतो
पुन्हा: पुन्हा: चुकण्यासाठी

**कु. दिपाली सु.पवार**
बी.एड. व्दितीय वर्ष

## लाडानं वाया गेलेलं पोर
## (व-हाडी गीत)

एकूलतं एक पोरगं माया लाडाचं होतं
लाडानं पोट्ट लय वाया गेलं होतं ।।
लहानपासन तयाले मी बाबू-बाबू करीत होतो
लाडानं पोट्ट माया तोंडावर मारत होतं।।
लसन-कांदे तं त्याले खेळयाले पुरत नसे
अन भाकरीच्या पिठाचा सत्यानाश करीत असे।।
शाळेत टाकल्यावर पोट्ट शाळेत जात नव्हतं
शाळेत गेल्यावर पोट्टायाचा डब्बा खात होतं।।
असं करता-करता पोट्टं वयात आलं होतं
संसार थाटावा म्हणून त्याच्यासाठी पोरगी पाहत होतो।।
लोक घरी आल्यावर मी त्याच्या पाया पडत होतो
कारण रोज पोट्ट घरी एक भांडण आणत होतं।।
पोरगी पाहता पाहता लय गाव हिंडलो
शेवटी अनाथलयातील मुलीला टिका लावुन आलो।।
लग्न झाल्यावर पोट्टयाले देलं अलग काढुन
आता तरी सुधरीन बायको आली म्हणुन।।
खरंच बायको आली म्हणून पोट्ट चांगलं झालं
गावातलं घरदार विकून शहरात राहाले गेलं।।
पोरानं आम्हाले वा-यावर सोडून दिलं
अन असं पोरंग झालं म्हणुन आम्ही भिकारी झालो।
खरंच लाडानं पोट्टं माय लय वाया गेलं।।

**कु. दिपाली सु.पवार**
बी.एड. व्दितीय वर्ष

## बाप

मुलावर असलेलं प्रेम जे
कधीच बोलून दाखवत नाही
काहीही व्यक्त न करता जो
आपला त्रास समजू शकतो
...... तो बाप असतो
जो अपरिमित कष्ट करतो
परिवाराचा आधारस्तंभ असतो
स्वतःच्या इच्छा आकांक्षा
मारुन मुलांच्या इच्छा पूर्ण करतो
...... तो बाप असतो
आपण फाटके तुटके कपडे घालुन
लेकराला मात्र जो टाईट ठेवतो
जो मोठमोठ्या अडचणीत ही
संयमाचा घाट असतो
...... तो बाप असतो
प्रत्येक मुलीचं पहिलं प्रेम
आणि सुंदर हिरो असतो
मुलीच्या लग्नावेळी धामाधुम
होऊन रडतो आणि
माझ्या परीला नीट सांभाळ
अशी विनंती करतो
...... तो बाप असतो

**मेघा नारायण धनोकार**
बी.एड. व्दितीय भाग २

## स्त्री

माता, भगिनी स्त्री
सखी, संसारी स्त्री
शिक्षित, प्रगती स्त्री
चैतन्य, उत्साही स्त्री
मशाल, नवदुर्गा स्त्री
जगतजननी पालन
करती स्त्री
मग का ? स्त्रीच स्त्रीची वैरीणी
मोकळेपणाने जन्मास
येऊ दे लाडकीस
तू शक्ती हो
तू प्रकाश हो
जगाचा
तुच शापाच्या भोगातून
मुक्त हो
तुच कर सगळे जतन
बघ कशी सांभाळते वतन
**निर्मला भिसे** (स्वरचीत)

## जीवनानुभव

प्रेम आहे फक्त शब्द
जीवनच झाले चाकोरीबध्द
इथे आहे फक्त स्वार्थाचा
पैशाचा ढोंगीपणाचा
बाजार
माणसालाच जडलेला
आहे माणसाचा
आजार
माणुसकीला, ख-या प्रेमाला
लागले आहे ग्रहण

येथे पैशासाठी होत आहे
रोजच मरण
जीवन आहे अनमोल
पण जीवनाला
राहिला नाही मोल
पैसा म्हणतो
ऐक माझे बोल
माणुसकीला ठेव दूर
नाहीतर मी आहे क्रुर
**निर्मला भिसे** (स्वरचीत)

**माझी कविता**

जेव्हा अनुभवातून बीज तयार होते
मनाला जाउन रुजवते
तेव्हा तयार होते
माझी कविता
जेव्हा आकाशातून उतरते
मातीतून उगवते
तेव्हा निसर्गाशी एकरुप होते
माझी कविता
जेव्हा असत्याच्या मार्गाकडून
सत्याकडे जाते
तेव्हा तयार होते
माझी कविता
जेव्हा माणसाच्या मनातील
राग द्वेषाचे काटे निघून
प्रेमाचे फुल रुजते
तेव्हा मानवाशी एकरुप होते
माझी कविता

**निर्मला महादेवराव भिसे**
(स्वरचीत)

**दुःखातले सुख**

दु:खातले सुख
लपवून सर्व दु:खाना
हसावे माणसाने
सदैव दु:ख झेलण्यास
तत्पर असावे माणसाने
हृदयातील वेदना, व्यथा
सांगू नये कोणाला
मात्र पर: दु:खात सामील
व्हावे माणसाने
वादळाचेही आव्हाने
स्वीकारावे माणसाने
अन दु:खाला पळवून
दु:खातले सुख
झेलावे माणसाने

**निर्मला महादेवराव भिसे**
बी.एड्. द्वितीय वर्ष
(स्वरचीत)

**चारोळी**

मरणे सहज सोपे अन
जगणे कठीण झाले
रडण्यास कैक मोके आले
पण हसणे कठीण झाले
**-संकलीत**

## आयुष्य

आयुष्यभर सोबत असून
जवळ कधी बसत नाही
एकाच घरात राहून आम्ही
एकमेकांस दिसत नाही
हरवला तो आपसांतला
जिव्हाळ्याचा संवाद
एकमेकास दोष देऊन
नित्य चाले वादविवाद
धाव धाव धावते आहे
दिशा मात्र कळत नाही
ह्दयाचे पाउल कधी
ह्दयाकडे वळत नाही
इतकं जगून झालं पण
जगायलाच वेळ नाही
जगतो आहोत कशासाठी
काहीच कसला वेळ नाही
क्षण ठीक येईल असा
घेउन जाईल हा श्वास
अर्ध्यावरच थांबलेला
असेल जीवन प्रवास
अजुनही वेळ आहे
थोडं तरी जगून घ्या
सुंदर अशा जगण्याला
डोळे भरुन बघून घ्या

**अनुसया गणेश पाचपोर**
बी.एड. व्दितीय वर्ष

## बाप

जो रोज एक नवं सरण चढतो
रोज एक नवं मरण जगतो
पण मुलांच्या कोवळया चेह-यावरचा
कोवळा आनंद असतो
होय, तो बाप असतो
जो कधी प्रेम दाखवत नाही
आपल्या मुलांसमोर चिंतेचा देखावा करत नाही
पण त्याच्या ह्दयात मायेची नदी
ओसंडून वाहात असते
तो बाप असतो...
ज्यात दिसत नाही आईच्या
उबदार पदराचं मोठेपण
ना ही संयमी आसवाचं शहाणपण
पण मुलांच्या चिंतेने सतत खंगत असतो
हो तो बाप असतो
जो क्षणाक्षणाला मन मारतो
मुलांच्या भविष्यासाठी
मुलांच्या रक्तात धावतो जिद्द
होऊन जिंकण्यासाठी
पण एक सांगू
जो वरवर दिसतो किंवा भासतो
तितका कोरडा नसतो
तो बाप असतो...

**कु. प्रियंका रामराव जोगदंड**
बी.एड. व्दितीय वर्ष
स्वरचीत

## आई

तू किती करतेस आम्हासाठी कष्ट...
तुझ्या सर्व अपेक्षा आम्हा
माहिती आहेत स्पष्ट...
तू आम्हा सुखी ठेवतेस सर्वदा...
तुझ्या कष्टा पायी आम्हा
माहिती आहे मर्यादा...
तू आम्हासाठी किती पाहिलेत गं स्वप्न...
माहिती आहे तू आम्हा, असते तू त्यातच मग्न...
आम्हासाठी किती कष्ट करतेस तू...
किती दुःख असो अश्रु पुसतेस तू...
कष्ट करतांना तूला रुतला जरी काटा
तरीही आम्हासाठी मोकळ्या करतेस वाटा...
काय म्हणू गं तूला तु आहेस ईश्वर
माता हिच आहे जननी न होत नश्वर
तुझ्यामुळे आम्हात आहे बळ
सांगतेस आम्हा योग्य मार्गे वळ
तुझ्या कष्टासाठी आम्ही आहोत गं ऋणी
आहोत तुझीच लेकरे म्हणुणी आम्ही गुणी
आम्ही होतो गं नतमस्तक तुझ्याच चरणी
आहेच इच्छा आमुची हो तुच माता पुढील जन्मी...

**अश्विनी अंभोरे** (स्वरचीत)
बी.एड. व्दितीय वर्ष

## विचित्र पण सत्य

विचित्र पण सत्य
भरलेला खिसा माणसाला
जग दाखवतो
आणि रिकामा खिसा जगातील माणसं दाखवतो. ज्याला
शंभर किलो
धान्याचं पोतं उचलता येतं
त्याला ते विकत घेता येत नाही.
आणि ज्याला विकत घेता येतं त्याला उचलता
येत नाही विचित्र आहे पण सत्य आहे
आपल्याला जे जे पाहिजे ते ते सर्व मिळाले
असते तर ... जगायला गंमत आणि देवाला किंमत
राहिली नसती... चांगले मित्र
आणि औषधे ही आपलयाला आयुष्यातील
वेदना दूर करायचे काम करतात. फरक
इतकाच की, औषधांना एक्सपायरी डेट
असते. पण मित्रांना नाही...

संकलन
**अनुसया ग.पाचपोर**
बी.एड. व्दितीय वर्ष

## उन्हाचे अभंग

उन्हाचे अभंग
उदास उन्हाचा
करावा उत्सव
वैशाखात प्राण
धूत जावे
एवढ्या न हेतू
तुझा साधासुधा
उन्हात फिराया
जात जाणे
पिवळ्या उन्हाचे
नहाते धुते ओठ
आकाश होउन
पीत जावे
माझ्या सावलीचे
तुला आमंत्रण
टाळुन दुपार
येत जावे
जाता जाता मात्र
ओले चिंब गाणे
झिजत्या गात्रात
नेत जावे

**बी.एड. व्दितीय वर्ष**
**प्रशिक्षणार्थी**

## रक्तातलं वादळ

रक्तातलं वादळ शमविण्याआधी
काजळ्या रात्रीत विस्तावाचा
प्राण जाण्याआधी...
तु विसावा घेऊ शकशील
आम्हीच आमची घरे जाळलीत
आमच्या रक्तानेच आम्हाला दगा दिला.
आमचे आम्हीच मुर्तिभंजक ठरलो
परक्या भावनांना
अतिथी देवोभव म्हणून स्वीकारलं
तु आता तरी रक्तातले वादळं सांडू नकोस
बर्फ मुठीत ठेव अन
विस्तवाला फुंकर घाल
हृदयात चंद्र अन तळहातात सूर्य हो
या यज्ञवेदीवर...
पलीकडच्या वेशीपासून फुलं अन
तुझ्या घरांपासुन फळं ठेव
मग निखा-यातून तुला चालावं लागेल
आणि मग... एखाद्या रात्री
काजळी चमकेल आणी निखारा
फुलू लागेल ह्या... याच यज्ञवेदीवर...

**कु.रुपाली राजेंद्र राखोंडे**
बी.एड. व्दितीय वर्ष

## बाबा

चालायला शिकवलं
बोलायला शिकवलं
जीवनात निर्णय घेण
देखील शिकवलं
काम पडल्यास त्यापेक्षा
जास्त रागावलं
कॉलेज मध्ये असो की कुठे
फार अडचण येते
बाबांना सांगताच
लगेच समस्या दूर होते.
कळत नाही मला
असे कसे होते
न सांगताच बाबांना
माझ्या मनातल समजते
कसं होईल ? काय होईल ?
हा प्रश्न पडत असते
जगभर फिरुन पाहिलं की,
कुणावर विश्वास बसत नसते
मग वाटतं...
हो हो बरोबर आहे
आई बाबा सांगताच तेच खरं असते
आई बाबासाठी तो
काहीही करु शकतो
त्यांच्यापेक्षा मोठं या
जगात कोणतरी असतं??
कुणासाठी आपण किती
रडलेलं असतो पण
आईबाबा साठी
आपलं जग सोडणं
यापेक्षा मोठं काहीच नसतं
कळतंच नाही मला
असं कसं होते
त्यांचा विचार केला
की आपलंच भलं होते
स्वत:चा विचार केला की अस वाटते
मग मात्र एकच वाक्य आठवते
येईल.. येईल...
जीवनात एक दिवस
असा देखील येईल
त्यांच्यासाठी करता करता
सर्व मिळून जाईल...

**धनश्री वसंतराव पतिंगे**
बी.एड. व्दितीय वर्ष

**चारोळी**

कपाळावरील रेषेत भाग्य शोधण्यापेक्षा
कपाळावरील घामातच भविष्य शोधल्यास,
आयुष्यात कपाळावर हात टेकविण्याची
तुमच्यावर कधीच वेळ येणार नाही
म्हणून नशिबवादी होण्यापेक्षा प्रयत्नवादी व्हा,
यश तुमची वाट पाहात आहे...

**धनश्री वसंतराव पतिंगे**
बी.एड. व्दितीय वर्ष

## मैत्री

आठवण तुझ्या सोबतीची
बेधुंद करी मनाला
नाव नेमके काय
कळेना या वेडेपणाला
सोबत आपण असतांना
व्हायच्या गाठी भेटी
भरकटलेलो मी
सावरायची सांगुन गोठी
एक दिवस शेवट
संपलं मात्र सत्र
डोळे रंगणी वळवले
विसरले सारे मित्र
कोणत्याही क्षणास माझ्या
नव्हता तुझा बंध
तु तर माझ्या
कोऱ्या पानावरचा निबंध
आठवतांना हे सारं
सगळं काही हरवते
दिवस नि रात्र
मन मात्र गहिवरते
नि:शब्द

**मनोज टिकार**
बी.एड. व्दितीय वर्ष
स्वरचीत

## स्वप्नांना पंख आहेत उडते मी...

स्वप्नांना पंख आहेत उडते मी
नाही कुठलीही मर्यादा,
नि:स्वार्थ भाव माझे
नि:स्वार्थ पंख माझे
आली लहर उडते
इच्छांच्या चांदण्या
तोडते मी...
स्वप्नांना पंख आहे
उडते मी...
पाहतात मला सर्व
भरारी होते मी...
आकांक्षाच्या किरणांना
उजाळा देते मी
स्वप्नांना पंख आहे
उडते मी...
भरारी माझी उंच
यश गाठते मी
स्वप्नांना पंख आहे
उडते मी...
परिसा परी दिसते
मज इच्छा पाहते मी
स्वप्नांना पंख आहे
उडते मी...
हे सर्व आहे माझे
पाहते मी...
गगनात फिरुनी
घिरट्या घालते मी
स्वप्नांना पंख आहे उडते मी
स्वप्नांना पंख आहे उडते मी...

**अश्विनी अंभोरे**
बी.एड. व्दितीय वर्ष (स्वरचीत)

## विझतो आज जरी मी

विझतो आज जरी मी
हा माझा अंत नाही
पेटेन उद्या नव्याने
हे सामर्थ्य नाशवंत नाही ।
छाटले जरी पंख माझे
पुन्हा उडेल मी
अडवू शकेल मला
अजून अशी भिंत नाही ।
माझी झोपडी जाळण्याचे
केलेत कैक कावे
जळेल झोपडी अशी
आग ती ज्वलंत नाही ।
रोखण्यास वाट माझी
वादळे आतूर होती
डोळ्यात जरी गेली धूळ
थांबण्यास उसंत नाही ।
येतील वादळे, खेटेल तुफान
तरी वाट चालतो
अडथळयांना भिऊन अडखळणे
पावलांना पसंत नाही ।
विझतो आज जरी मी
हा माझा अंत नाही
पेटेन उद्या नव्याने
हे सामर्थ्य नाशवंत नाही ।

**आम्रपाली भि.मनवर**
बी.एड. व्दितीय वर्ष

## मैत्री

कधी तरी भेटायला
कारण लागत नाही,
भेट होत नाही म्हणून
अंतर वाढत नाही,
सुख दुःखे वाटून घ्यायला
सांगावं लागत नाही आणि
मैत्री शिवाय आयुष्याला
अर्थच उरत नाही,
रक्ताची नाती जन्माने मिळतात,
मानलेली नाती मनाने जुळतात
पण नाती नसतानाही
जी बंधने जुळतात
त्या रेशीम बंधनांलाच
मैत्री असे म्हणतात

## पाऊस

आता एक सर बरसून गेली
वर्षाची सुरुवात करुन गेली
सांजवेळ कातर आकाश धरेला
कोपरा मनातील उजळून गेली
तोच तो ध्वनी कोवळा मधूर
एक एक पेशी जागवून गेली
तरीही जाणे व्याकुळ असे की
तहान जीवाची वाढवून गेली
हरपले भान धुंदी दाटलेली
तन मन क्षणी वादळून गेली
काय हरवले काय सापडले कळेना
सुरुवात मजला गोठवून गेली

स्वरचीत : **कु.कांचन गोवर्धन वरोकार**
बी.एड. व्दितीय वर्ष

## मन

कधी खळखळणा-या झ-यासारखं
तर कधी शांत नदीसारखं
कधी निरागस बालकासारखं
तर कधी बादळ वा-सारखं
असंच असतं मन, असंच असतं मन
कधी फुलांच्या पाकळ्यांसारखं
तर कधी त्यांच्या सुगंधासारखं
कधी निरभ्र आकाशासारखं
तर कधी अथांग सागरासारखं
असंच असतं मन, असंच असतं मन...
कधी अबोल शब्दांसारखं
तर कधी किलबिल पक्ष्यांसारखं
कधी भरलेल्या नयनांसारखं
तर कधी मोहक पिसा-यांसारखं
असंच असतं मन, असंच असतं मन...
कधी शीतल चंद्रासारखं
तर कधी टिपूर चांदण्यासारखं
कधी शिंपल्यातील मोत्यांसारखं
तर कधी लख्ख सूर्यासारखं
असंच असतं मन, असंच असतं मन...

स्वरचीत- **प्रियंका रामराव जोगदंड**
बी.एड. व्दितीय वर्ष

## शिक्षक म्हणजे...

शिक्षक म्हणजे,
आयुष्याला कलाटणी देणारी प्रेरणा
ध्येयापूर्तीसाठी मार्ग दाखवणारी दिशा
कधी बिकट परिस्थितीत प्रेमाची साथ, तर
कधी पाठीवरील शाबासकीचा हात
कधी कौतुकाचे गोड शब्द तर कधी
हातावर बसणारा छडीचा मार.
शिक्षक म्हणजे,
चांगले संस्कार करणारी मूर्ती
संकटकाळात धैर्य देणारी स्फूर्ती
चारित्र्यपूर्ण विद्यार्थी घडवणारा शिल्पकार
जादूची छडी जी करते विद्यार्थ्यांची
स्वप्ने साकार
शिक्षक म्हणजे
सखोल मूलभूत ज्ञानाचे भांडार
दूर करील जीवनातील अनंतमय अंधार
अन्यायाविरुध्द आवाज उठवणारी तलवार
अनुभवातून निर्माण होणारा साक्षात्कार
असे हे शिक्षकाचे आजन्म न फिटणारे उपकार

**संकलन:-** ममता संजय लंके
बी.एड. व्दितीय वर्ष

## सुविचार

विद्या ही तलवारीसारखी आहे. तिचे महत्व तिला
धारण करणा-यावर अवलंबून आहे
समतेच्या वागणुकी शिवाय अंगी असलेले गुण
कधीही विकास पावणार नाहीत.
जिथे एकता तिथे सुरक्षितता.

संघर्षाने माणूस जरी घडत असला
तरी तो संघर्ष त्याला लढण्यासाठी बळ
नक्कीच देतं...

स्वरचीत **कु.ममता संजय लंके**
बी.एड. व्दितीय वर्ष.

## माय

तपु घातल्या दुधाले
जसी झाकुन ठेवे साय
तसं पांघरुण आये
माह्यावर माही माय ।
नउ मयन्याचं ओझं
वागुन पावलो पावली
जल्म देता कष्ट किती
तरी होटात हासली ।
माहया सुख दुःखासाठी
जागुन काळल्यात राती
होता पोटात अंधार
लावून डोयाच्या त्या ज्योती ।
करुन हाताचा पायना
कळी खांद्याले वागोलं
तीनं सोसले चटके
मळे पदराखाली हुलं ।
पालु बांधुन पोटाले
उनातानात राबली
संतापल्या सुर्यावर
नायी कई कातावली ।
घास कनकटानं घेतला
तीच्या पायाचा मासाचा
आये मातीच्या ढेकलाले
वास तिच्या रगताचा ।
माय वाटीनं चालता
काट्यालेई लागे भेव
तिच्या अनवानी पायाचा
होता रस्त्याले बरताव ।
एक दिस माय मायी
मले सोडून जाईल
नायी लहानपना वानी
माये आसू ते पुसीन ।
नायी बोलणार मासी
असुन पोटचा मी बाग
खोटी मानसा तुई रीत
मीच लावीले तीले आग ।

संकलित
**चंदा कैलास टिकार**

## वाट

भोवती काळोख आहे दाट पोरा
तूच शोधावी तुझी तू वाट पोरा ।
चालतांनी जपत जा अपुल्या जिवाला
जास्त आहे या पथावर घाट पोरा ।
गाठताना ध्येय हे, थांबू नको तू
लागले जंगल जरी घनदाट पोरा ।
भाकरी रांधायच्या आता स्वत: च्या
आयते मिळणार नाही ताट पोरा ।
खूप काही शिकवते ती माणसाल
या सुखापेक्षा व्यथेची लाट पोरा ।
रोजच्या या संकटाशी सामना कर
नेहमी काढू नको पळवाट पोरा ।
खाचखळगे, अडचणी असल्या तरीही
धाडसाने वलय अपुले थाट पोरा ।
एकटा तू झुंज दे या वादळाशी
तू नको पाहू कुणाची वाट पोरा ।

**कु.कोमल माणीकराव इंगळे** (संकलित)

## ती

ती सतत काळजीतच राही...
कधी नव-याच्या... कधी मुलाच्या...
ती कायम गुंतलेली राही... घरात...
नातेवाईकांत...
ती नेहमी घुसमटत राही... रुढीत अन
परंपरात...
कधी येताच आलं नाही तिला...
या जाळ्यातून बाहेर...
कधी घेताच आलं नाही तिला
आभाळातलं सारं चांदणं कवेत...
पण... आता ती बदलणार आहे...
न डगमगता झुंजणार आहे
समाजाशी... स्वत:शी...
अगदी सर्वांशीच...!
आणी कोशातून बाहेर पडणार
आहे
सा-या आव्हानांना
कवेतही घेणार आहे
तिला कोणीच आव्हान
देऊ शकणार नाही
आणि असंच जपणार
आहे ती
स्वत:चं अस्तित्व... !

संकलित
**जोगदंड प्रियंका रामराव**
बी.एड व्दितीय वर्ष

## मैत्री

नात्याचे अनेक अर्थ आहेत
उलगडून सांगते ती मैत्री
आयुष्यातला हळूवार क्षण
अलगद जपते ती मैत्री
कधी रुसते, कधी हसते
तरी सदैव हदयात वसते ती मैत्री
आपुलकीचे जिव्हाळ्याचे क्षण
डोळ्यात साठवते ती मैत्री
जीवनाचा धडधडणारा श्वास
म्हणजे मैत्री
प्रेमाच्या सुंदर वेलीवर
भावनांच्या जलाने
हदयाच्या कोप-यात
उगवणारे फुल म्हणजे मैत्री ।

संकलन
**कु.ऐश्वर्या अविनाश गवई**
बी.एड. व्दितीय वर्ष

## चारोळी

बेघर होउन बसले आज मी,
या गजबजलेल्या युगात
अस्तित्व हरवून बसले आज मी
अंधा-या वाटेवर प्रकाश शोधत आहे
कधी तरी प्रकाश दिसेल
या आशेने जीवन जगत आहे.

**संकलन - संगिता विनोद उगले**

### नशीब

हे आकाशातून पडत नाही किंवा
जमिनीतून उगवत नाही
नशीब आपोआप निर्माण होत नसते
तर केवळ माणूसच प्रत्यक्षात स्वतःचे
नशीब स्वतःच घडवत असतो
नशिबात असेल तसे घडेल ही गोष्ट
खरी नसून आपण जे करु
त्याप्रमाणे नशीब घडेल. हीच गोष्ट खरी आहे.

**कु. निकीता रामभाऊ उगले**
बी.एड.भाग २

### चारोळी

घराभोवती कुंपण हवं
म्हणजे आपलं जग ठरवता येतं
बाहेर बरबटलेलं असलं तरी
आपल्यापुरतं सावरता येतं
भ्रम सारा निस्तेज आसवांचा
परतीचा प्रवास अबोल पाखरांचा
शब्द हरवले श्वासात आठवणींच्या
मनी पसारा पुन्हा ओळखीचा

**पुनम लुले** बी.एड.भाग २

## कविता

आयुष्य खुप सुंदर आहे
सोबत कुणी नसलं तरी,
एकटयानेच ते फुलवत रहा
वादळात सगळं वाहून गेलं
म्हणून रडत बसू नका
वेगळं असं काही माझ्यात खास नाही
असं म्हणून उदास होऊ नका
मृगाकडे कस्तुरी आहे
फुलात गंध आहे
सागराकडे अथांगता आहे
माझ्याकडे काय आहे, असं म्हणून रडू नका
अंधाराला जाळणारा
एक सूर्य तुमच्यातही लपला आहे
आव्हान करा त्या सूर्याला!!!
मग उगवेल तो तुमच्या आयुष्यात नवीन क्षितीज घेऊन
अंधारामय रात्र संपवून सोनेरी किरणांनी सजून
मग रोजच उगवेल एक नवी सकाळ
उत्साह ध्येयाने भारुन म्हणून...
आयुष्य खुप सुंदर आहे
सोबत कुणी नसलं तरी
एकटयानेच ते फुलवत रहा...

संकलन
**कु.ममता संजय लंके**
बी.एड. व्दितीय वर्ष

# जागतिक पर्यावरण दिवस

५ जून हा जागतिक पर्यावरण दिवस मानला जातो. पर्यावरणात जर आम्ही समतोल राखला तर मानवजात सृष्टीत टिकून राहील. पर्यावरण म्हणजे पृथ्वीवरील आणि पृथ्वीभोवतालच्या वातावरणाचा समतोल, हा समतोल राखण्यात वृक्ष, झाडे आम्हाला खूप मदत करतात म्हणूनच भारतीय संस्कृतीमधील वेगवेगळ्या दिवशी वेगवेगळ्या वृक्षांची, रोपांची पूजा करण्याची परंपरा खूप दूरदृष्टीची म्हणावी लागेल.

रोज संध्याकाळी तुळशीला पाणी घालून तिच्याजवळ दिवा लावायचा, वटपौर्णिमेला मोठ-मोठ्या पारंब्या असणा-या वडाची पूजा करायची या आणि अशा रितीने वृक्षांचे जतन होते. पर्यावरणाचा समतोल साधतो. झाडे कार्बनडाय ऑक्साईड शोषून घेतात, ऑक्सीजन बाहेर फेकतात. ग्लोबल वॉर्मींगपासूनही आम्हाला हे वृक्ष वाचवतात. एकाच ठिकाणी उभी राहणारी झाडे. ऊन, वारा, पाऊस सहन करतात आणि दुसऱ्यांना सावली देतात. लाकूड, फळे, फुले, बिया आणि औषधीसुध्दा आम्हाला हे वृक्षच देतात.

पक्षी, प्राणी, कृपी असे अनेक जीव झाडांच्या सहाय्याने राहतात. ऑक्सीजन म्हणजे प्राणवायूचे हे एक कारखानेच आहेत झाडे वाचली तर पर्यावरण सुरक्षित राहील आणि पर्यावरण आमचे म्हणजेच मानवजातीचे संरक्षण करील त्यामुळे जंगलाचे रक्षण केले पाहिजे. ही जंगले तयार व्हायला हजारो वर्षाचा काळ जावा लागला. जंगले तोडायला मात्र अगदी थोडे दिवस पुरतात हे आम्ही विसरत आहोत.

पक्षी, प्राणी, मानवजात यांचे पूर्ण जीवन निसर्गावर अवलंबून आहे. उद्योग, कारखाने यांची बेफाम वाढ होत आहे. माणसे शहराकडे धाव घेत आहेत. या सा-यांसाठी निर्दयपणे झाडे तोडली जात आहेत. वृक्षप्रेमाचे हे जुने नाते माणूस विसरला आहे. आता स्वत:च्या सवयी बदलायची वेळ आहे.

कागदापेक्षा ई-मेलचा अधिक वापर, कमी उर्जेचे दिवे वापरुन फेकण्याच्या वस्तूंऐवजी चिनी मातीच्या कप-बश्या, पेपर, नॅपकीन ऐवजी सुती टॉवेल, पाण्याचा जपून वापर हे आम्ही करायला हवे. पर्यावरणाचे भान ठेवले तरच मानवजात वाचण्याची शक्यता आहे.

जगाला वाचविण्यासाठी जागतिक पर्यावरण दिवसाची योजना करण्यात आली आहे.

**कु.पल्लवी प्रकाश काकडे**
बी.एड. द्वितीय वर्ष

**शिक्षक :** सांगा पाहू
विद्यार्थी आणि डॉक्टर यांच्यामध्ये का साम्य आहे ?
हात वर करुन बंड्या सांगतो : 'सर, ऑपरेशन झाल्यावर डॉक्टर आणि पेपर झाल्यावर विद्यार्थी एकच सांगतात'
**शिक्षक :** काय ते ?
**बंड्या :** आम्ही आमच्या परीने चांगले प्रयत्न केले.

# हिंदी विभाग

## तू जिंदगी को जी

तू जिंदगी को जी,
उसे समझने की कोशिश न कर
सुन्दर सपनों के ताने बाने बुन
उसमे उलझने की कोशिश न कर
चलते वक्त के साथ तू भी चल
उसमे सिमटने की कोशिश न कर
अपने हाथों को फैला, खुल कर साँस ले
अंदर ही अंदर घुटने की कोशिश न कर
मन में चल रहे युध्द को विराम दे
खामख्वाह खुद से लडने की कोशिश न कर
कुछ बाते भगवान पर छोड दे
सब कुछ खुद सुलझाने की कोशिश न कर
जो मिल गया उसी में खुश रह
जो सुकून छीन ले वो पाने की कोशिश न कर
रास्ते की सुंदरता का लुत्फ उठा
मंजील पर जल्दी पहूंचने की कोशिश न कर

**श्वेता दुबे**
बी.एड. व्दितीय वर्ष

जीवन में कठिनाइयाँ हमें बर्बाद
करने नही आती है।
बल्की यह हमारी छुपी हुई सामर्थ्य,
और शक्तियों को बाहर निकलने में हमारी
मदद करती है।
कठिनाइयाँ को यह जान लेने दो,
की आप उससे भी ज्यादा कठिन हो।

**- ए.पी.जे. अब्दुल कलाम**

**श्वेता दुबे**
बी.एड़. द्वितीय वर्ष

बडा आदमी वह हैं
जो अपने पास बैठे
व्यक्ती को छोटा
महसुस ना होने दें!
जिन्दगी भी
कितनी अजीब हैं
मुस्कुराओं
तो लोग जलते हैं
तन्हा रहो
तो सवाल करते हैं

संकलन:- **अनुसया ग.पाचपोर**.
बी.एड. व्दितीय वर्ष

## सपनों में रख आस्था

सपनों में रख आस्था
सपनों में रख आस्था कर्म तू किए जा
त्याग से ना डर आलस परित्याग किए जा।
गलती कर ना घबरा
गिरकर फिर हो जा खडा।
समस्याओं को रास्तों से निकल दे,
चट्टान भी हो तो ठोकर से उछाल दे।
रख हिम्मत तूफानों से टकराने की,
जरुरत नही है किसी मुसीबत से घबराने की।
जो पाना है बस उसकी एक पागल की तरह चाहत कर,
करता रह कर्म मगर साथ में खुदा की इबाबद भी कर,
फिर देख किस्मत क्या क्या रंग दिखलायेगी,
तुझको तेरी मंजील मिल जायेगी, मंजील मिल जायेगी।

संकलन - **ऋतिका देशमुख**
बी.एड. व्दितीय वर्ष

## मेरी प्यारी माँ की यादें

मेरी प्यारी माँ की यादें
ओ माँ मेरी दुलारी माँ ।
शत शत तुझे नमन माँ
आपके आँचल में ही तो मैंने जीना सीखा
तुझे प्रणाम माँ तुझे प्रणाम।
आपका प्यार दुलार
सदा ही याद आता माँ
आपकी ममता भरी आँखे
मुझे बेचैन कर देती माँ
सदा ही आप मेरी यादों में हो माँ।
उस क्षण को मैं कैसे भुल पाउँ माँ
जिसने मुझे जिना सिखाया हिम्मत से।
आपकी प्यारी भरी ममता
मैं कभी तोल नहीं सकती माँ
सदा ही आपकी प्रेरणा मुझे प्रेरित
करती रहगी ओ माँ।
चाहें जितना भी वर्णन कर लूँ
उतना ही आपके लिये कम हैं माँ
आप में मुझे दिखती ईश्वर की झलक।
हर मुश्किल को आसान कर देती हो माँ
कैसे यह सब आपसे हो पाता हैं माँ।
आप ही हो मेरी हिम्मत
जब आती मुश्किल घडी मेरी सामने
जब भी आँख बंद करके आप को याद करती
युही भाग जाती सब मुश्किले।
ओ प्यारी माँ
ईश्वर से यही मेरी प्रार्थना
सदा ही आप खुश रहे
दुनियाँ की हर खुशी आप को मिले
यही मेरी कामना ओ मेरी प्यारी माँ।

**कु.नम्रता मुनीश्वर**
बी.एड. व्दितीय वर्ष

जो समय को मुल्य देते है, वे मूल्यवान बन जाते है।
जो जीवन को नियमों के अधीन कर लेते है, वे मन से स्वतंत्र रहते है।
बिना परिश्रम की कोई भी प्राप्ती अस्थाई ही रहती है।
हमारा आज का एक सत्कर्म कल हमें दुसरे सत्कर्म में प्रेरित करेंगा।

# English Section

# Role of Teacher in Modern Sociology

Dr.S. Radhakrishnan (Indian Philosopher, academic & statesman who served as the first Vice President of India & Second President of India once noted "A teacher's place in society is of vital importance. Acts as rivot for the transmission skills from generation to generation and helps to reep the lamp of civilization burning."

A teacher in society is both significant & valuable. A great influence to society he lives in. A role of teachers is so vast to acquire professionalism & ethics and abide by their own moral code. A bridge between the students, collegues of community.

The world changes day byday and there is no doubt that the modern society is not the same with ancient one. Education system has completely changed. Nowadays being teacher does not mean only helper in difficult process of getting education; it now means being creati·e and highly talented "guide", accompany students in all way possible.

Today teacher need to be more attention to new methods of teaching, making it more enjoyable. With the information easily available to students the teacher needs their barers how to gain information and how to select and use them. Teacher now are considered as facilitators in the learning process. They are more now a supporters to students and advisors towards parents.

We notice that great number of changes in this field and many have influence on the role of teacher.

Teacher in modern classrooms are now more of goal letter and organize the warning process accordingly. In past teacher used to follow a syllabus which was compulsion. Now they have independence to choose the teaching materials, make a syllabus of teach students of their own to maximize. Another difference in the past & present teacher is use of technical background. (computer, powerpoint, projectors etc.) Instead of chalk face, they need to be information technology expert, a expert, a

technician - One bag challenge for teachers now that the role of them in school management has also changed. Individuals, who can make decision, scores with stress of changing world. Student are deeply affected by teachers love, affection, character, competence & moral commitment.

The young today are facing a world in which communication and information revolution has led to changes in spheres: Scientific, technological, political, economic, social & cultural.

Education is necessary for the politicians, businessmen, artist, farmers, religious group, student etc. for their respective growth. The role of teacher is to snaps the minds of younger generation. Shaping on positive line, development of a scientific & humanistic attitude & temper, self discipline.

The Task of Modern educator is not to cut down jungles, but to irrigate deserts. - C.S. Lewis

**Vaishnavi Pramod Bhuibhar**
**B.Ed. 2nd Year**

## Your Best

If you always try your best
Then you'll never have to wonder
About what you could have done
If you'd summoned all your thunder.
And if your best
Was not as good
As you hoped if would be
You still could say,
"I gave today
All that I had in me,"
Collected by Minal Nirale

Thought

Health is the greatest possession.
Contentment is the greatest treasure.
Confidence is the greatest friend.

**Nirmala Bhise** **B.Ed. 2nd Year**

**Thought**

1) Treat others the way you want to be treated.

**Meaning** - Everything you do to others come bad to yourself. If you treat others with love and affection will love you back. If you will hate others and throw stones at them, they will hate you too. So always treat others the same way you want them to treat you.

# Managing Learning Difficulties and Disorders.

We are teaching in the classroom. While teaching we are facing lots of problems can you tell me, while teaching to the children which problems are you facing? There are different types of problems. Like some students are not paying attention towards studies. Some students have reading, breaking, hearing, visualising problems.

Some times what will happen we can not tell by looking that child has learning disability. Its very difficult to diagnose. All the problems related to hearing, speaking, seeing & making calculations are called learning difficulties & disorders. But learning disability doesn't have anything to do with persons intelligence-after all such successful people as Thomes Alva Edison. Alexander Gram Bell, Winston Churchill, Abhishek Bachchan & Walt Disney all had learning disabilities.

It time to search for comprehensive solutions for maximum impact. We have to find out the problems. The problems are many

Lack of Motivation

Fear of the classroom situation

Overhearing teachers & parents to complete reasons.

What is Disability?

A physical or mental condition that means child can not use part of his body completely or easily. He is mentally or physically handicap but we have to prefer to use the word disability rather than handicap.

Learning disability is problem that affects brains ability to receive, empress, analyse or store information. These problems can make it difficult for students to read, write, spell or solve math problems.

A learning disability is not problem with intelligence. There is problem in nervous system. They can see, hear & undestand things differently. But it is a neurological disorder that affects brain ability to receive, process, store & respond to information.

**Learning Disabilities;-**

1) Dyslenia

2) Dysgraphia
3) Dyscolculio
4) Dyspreania
1) Dyslenia

A slight disorder of the brain that cause difficulty in reading & spelling but does not affect intelligence.

Verbal learning disability is dyslenia. They have average & above average Intelligence. Their I.Q. is 90, they are not mentally retarted.

he also gets confused between d & b, m & w, p & q or writes c or , E or

**2) Dysgraphia**

It is related to poor handwriting. It is learning disability resulting from the difficulty in empressing thoughts in writing & graphing.

**3) Dycalculia**

A person with dyscalculio has dificulty in understanding & using math concepts.

**4) Dycalculia:**

A person with dysprania may mens up words & sentences while talking. Education is not book learning. The training by which the current of empression of will are brought under control & become fruitful is called EDUCATION.

**Humanity**

Humanity can be defined as quality of being human: The peculiar nature of man, by which he is distinguished from other beings. Being human does not mean that an individual possesses humanity. If you want to understand the quality of humanity in an individual take note of what he does for people who give nothing back in return to the favour they have offered. One of the most outstanding examples of extra ordinary humanity in a human being has been portrayed beautifully by Mother Teresa

"humanity means caring for and helping others whenever and wherever possible. Humanity means helping others at times when they need that help the most, humanity means forgetting your selfish interests at times when others need your help.

"Humanity means extending unconditional love to each and every living being on Earth."

Ku.Pranoti Sanjay Gedam, b.Ed.-IInd year.

**Ku.Vidya S. Parakh**
**4th Sem. B.Ed.**

# अहवाल विभाग
# २०१९-२०

# वाचन- परावर्तित विषय वस्तू (RRT)

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत वाचन परावर्तित विषय वस्तु या प्रात्यक्षिकाचे आयोजन दि.२३/१२/२०१९ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय येथे करण्यात आले. हे प्रात्यक्षिक दि.२३/१२/२०१९ ते ३०/१२/२०१९ या कालावधी दरम्यान करण्यात आले. या प्रात्यक्षिकाचे मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. वसुधा देव मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या प्रात्यक्षीकाचा उद्‌घाटन समारंभ आयोजित करण्यात आला. अध्यक्षा म्हणून मा.प्रा.डॉ.देव मॅडम होत्या. त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले त्यानंतर प्रात्यक्षिकाला सुरुवात झाली. वाचन व परावर्तित विषय वस्तु या प्रात्यक्षिकाचा विषय चिन्मय मिशन ट्रस्ट हा होता त्यानंतर पाच गट पाडण्यात आले. पाचही गटांना वेगवेगळया Activity देण्यात आल्या. प्रत्येक गटाचे गटप्रमुख निवडले गेले. त्या Activites पुढीलप्रमाणे आहेत.

१. गटचर्चा

२. चर्चासत्र

३. पोस्टर सादरीकरण

४. PPT सादरीकरण

५. परिसंवाद

या Activites देण्यात आल्या. नंतर प्रत्येक गटाला वाचनासाठी पुस्तकाचे वाटप करण्यात आले. त्यानंतर दि.२४/१२/२०१९ ते २८/१२/२०१९ या कालावधीत वाचन परावर्तन या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले. दि.२४/१२/२०१९ ला प्रत्येक गटाने वाचन व परावर्तित विषय वस्तु या प्रात्यक्षिकाअंतर्गत चिन्मय मिशन यांच्या पुस्तकांचे वाचन केले व मुद्यानुसार ते मांडण्याचा प्रयत्न केला. या दरम्यान प्रात्यक्षिकाच्या मार्गदर्शिका प्रा.डॉ.वसुधा देव मॅडम यांनी मार्गदर्शन केले व मुद्यांनुसार ते कसे मांडायचे ते सांगितले.

त्यानंतर दि.२६/१२/२०१९ रोजी दुपारी २.०० पर्यंत पुस्तकांचे वाचन करण्यात आले व नंतर ती पुस्तके वाचल्यानंतर सर्व गटातील विद्यार्थ्यांनी मुद्यांना अनुसरुन आपले मत मांडले व आपले अनुभव सांगितले हे पुस्तके वाचून त्यांच्यात कोणता बदल झाला. त्यांच्या विचाराच्या कक्षा किती रुंदावल्या हे प्रत्यक्षात उतरवले. या दिवशी सुध्दा प्रात्यक्षिकाच्या मार्गदर्शिका प्रा.डॉ.देव मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

त्यानंतर दि.२६/१२/२०१९ रोजी या प्रात्यक्षिका अंतर्गत Metacognitive Awareness of Reading Strategies Inventory ही चाचणी घेण्यात आली. या चाचणीचा अर्थ मार्गदर्शक प्रा.डॉ.देव मॅडम यांनी समजावून सांगितला या चाचणीतील प्रत्येक प्रश्नावरचा अनुभव लिहिला.

त्यानंतर दि.२७/१२/२०१९ रोजी सर्व गटातील प्रशिक्षणार्थींनी स्वत:चे लेखी काम पूर्ण केले. पुस्तक वाचनानंतर आपले मत आपले अनुभव मुद्यांच्या आधारे मांडले.

त्यानंतर दि.२८/१२/२०१९ रोजी गटाच्या प्रात्यक्षिकांचे सादरीकरणाचे नियोजन करण्यात आले. गटाला मिळालेले पोस्टर सादरीकरण करण्यात आले. यात विद्यार्थ्यांनी त्यांच्या विषयावर पोस्टर बनवून ते सादर केले. या प्रात्यक्षिक सादरीकरणाला प्रा.डॉ.वसुधा देव मॅडम यांची उपस्थिती लाभली.

दि.३०/१२/२०१९ रोजी बाकी ४ गटांचे प्रात्यक्षिकाचे सादरीकरण झाले. या दिवशी गटचर्चा, चर्चासत्र, PPT सादरीकरण, परिसंवाद इत्यादींचे सादरीकरण झाले.

या प्रात्यक्षिक सादरीकरणाला प्रा.डॉ.देव मॅडम, प्रा.डॉ.वातकर मॅडम, प्रा.डॉ.सामुद्रे मॅडम, प्रा.डॉ.धारसकर मॅडम यांची उपस्थिती लाभली. या सगळयांचे खूप मोलाचे मार्गदर्शन लाभले.

अशाप्रकारे प्रात्यक्षिकाचा अंतर्गत पाच उपक्रम घेण्यात आले. सर्वच प्राध्यापकांनी अमूल्य असे मार्गदर्शन केले व प्रात्यक्षिकाचा समारोप झाला. अशाप्रकारे हे प्रात्यक्षिक पार पडले.

**डॉ. वसुधा देव**
सहयोगी प्राध्यापक,
समन्वयक, वाचन व परावर्तन कार्यशाळा

# SUPW कार्यशाळा

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठांतर्गत SUPW कार्यशाळेचे म्हणजेच समाजोपयोगी उत्पादन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा दि.१८/१२/२०१९ आणि दि.१९/१२/२०१९ रोजी घेण्यात आली. त्यानंतरच्या दिवशी या कार्यशाळेमध्ये बनवलेल्या वस्तुंचे प्रदर्शन मांडण्यात आली आणि दि.२१/१२/२०१९ रोजी या कार्यशाळेचा समारोपीय कार्यक्रम आला. ही कार्यशाळा शासकीय अध्यापक महाविद्यालयामध्ये आयोजीत करण्यात आली.

SUPW या कार्यशाळेच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाला प्र. प्राचार्य डॉ. देव मॅडम यांनी अध्यक्षस्थान भूषविले. यामध्ये प्रमुख अतिथी म्हणून लाभलेल्या शितल वानखडे मॅडम यांनी संपूर्ण कार्यशाळेमध्ये प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. उदघाटन कार्यक्रमानंतर कार्यशाळेला प्रारंभ झाला यामध्ये सुरुवातीला शितल वानखडे मॅडम यांनी सर्व शिक्षक प्रशिक्षणार्थींना गणपती बनवायला  शिकवले. हा गणपती शाडू मातीपासुन बनविण्यात आला. कारण आजकालच्या युगामध्ये पर्यावरणाची हानी अनेक गोष्टींमुळे होत असते म्हणून सर्वांनी इकोफ्रेंडली गणपती बनवून पर्यावरणाचा ऱ्हास टाळावा हा यामागील उद्देश होता. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले कलात्मक सुलगुणांना वाव मिळावा हा देखील एक उद्देश या कार्यशाळेचा होता.

पहिल्या दिवशी गणपती बनवून त्याला सुकविण्यासाठी ठेवण्यात आले व दुस-या दिवशी सकाळच्या सत्रात वानखडे मॅडम यांनी प्रशिक्षणार्थींना लिफाफे, कोकोडाईल पेपरपासून बॅग व फील्डर फाईल बनविणे शिकविले. त्याच दिवशीच्या दुपारच्या सत्रामध्ये गणपतीला रंग देण्याचे काम करण्यात आले. दि.१९/१२/२०१९ ला गणपती व इतर वस्तु बनून तयार होत्या. नंतरच्या दिवशी गणपती सुकण्यासाठी ठेवण्यात आले व त्यानंतर कार्यशाळेमध्ये बनविलेल्या सर्व वस्तुंचे प्रदर्शन मांडण्यात आली. सर्व प्रशिक्षणार्थी यांनी उत्तमरित्या सर्व साहित्य तयार केले. दि.२१/१२/२०१९ रोजी या कार्यशाळेचा समारोपीय कार्यक्रम झाला. त्यामध्ये आधी सर्व प्राध्यापकवृंदांनी प्रदर्शनीमध्ये मांडलेल्या साहित्याचे निरीक्षण केले. सर्व प्राध्यापकांनी प्रशिक्षणार्थ्यांच्या कार्याची प्रशंसा केली.

समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ.देव मॅडम होत्या. कार्यक्रमाला डॉ.सामुद्रे मॅडम, डॉ.वातकर मॅडम, डॉ.धारस्कर मॅडम यांची उपस्थिती लाभली. अशाप्रकारे SUPW ही कार्यशाळा पार पडली.

**डॉ. वसुधा देव**
सहयोगी प्राध्यापक
समन्वयक ,
SUPW ही कार्यशाळा

# I.C.T. Workshop

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत शासकीय अध्यापक महाविद्यालय अकोला येथे दि.०२/०७/२०१९ ते १२/०७/२०१९ या दरम्यान I.C.T. वर्कशॉप आयोजित करण्यात आले होते.

या वर्कशॉपच्या समन्वयक प्रा.डॉ.वसुधा देव यांनी या कार्यशाळेचे प्रास्ताविक केले तर या कार्यशाळेला मार्गदर्शक मा. श्री. महेश बाहेती सरांनी या कार्यशाळेचा कारभार सांभाळला. दि.०२/०७/२०१९ रोजी बाहेती सरांनी I.C.T. कार्यशाळेमध्ये, कार्यशाळेचे महत्त्व, शिकविण्याचे उद्दिष्ट्ये शिकविण्याची गरज आणि या अध्यापन कार्यशाळेचा उपयोग कसा करायचा पुढील दिवसामध्ये I.C.T.मध्ये Home मध्ये font, style, copy, format, cut pointor and editing याचे मार्गदर्शन केले. Insert Page मध्ये Tables, Pages, Footer text, symbol आणि layout मध्ये them's page, setup, Background, paragraph, Arrange आणि malling मध्ये create, start mail, merge write & insert fields आणि view मध्ये Document views, show/hide zoom window, macros रिबन यामध्ये मुख्य तीन भाग आहेत. आदी सरांच्या मार्गदर्शनाखाली व प्रा.डॉ.देव यांच्या सहकार्याने ही कार्यशाळा उत्तमरित्या पार पडत होती. यामध्ये M.S.Word, M.S.Office Tab आणी tools, M.S. word मध्ये P.P.T. बनविणे वेगवेगळ्या effect & slide बनविणे यांचे मार्गदर्शन केले. power point मध्ये slide तयार करणे, slide Layout select करुन त्याप्रमाणे slide Design करावी लागते. या सत्रामध्ये मार्गदर्शक बाहेती सरांनी प्रत्येक सत्रामध्ये प्रात्यक्षिक देत होतो. त्यावर प्रश्न उत्तराच्या माध्यमातून बाहेती सरांनी online submission blogs कसा तयार करायचा याबाबत मार्गदर्शन केले. blogs सुरु करण्याचे अनेक कारणे आहेत. blogs हा केव्हाही उपयोगात आणता येतो. संगणक तंत्रज्ञानात जलद सुधारणा केल्याने तांत्रिक कौशल्य विकसित होण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांच्या स्वयंअध्ययनास मदत होऊन सोबतच बौद्धिक विकास होतो.

या कार्यशाळेमध्ये या सर्वच बाबींचे मार्गदर्शन करण्यात आले तर या महत्वपूर्ण कार्यशाळेचा समारोप दि.१२/०७/२०१९ रोजी बाहेती सर, मा.प्राचार्य डॉ.वसुधा देव यांच्या मार्गदर्शनाखाली झाला.

या कार्यशाळेत सर्व प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी यांचा मोलाचा सहभाग लाभला. या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

**डॉ. वसुधा देव**
सहयोगी प्राध्यापक
समन्वयक ,
ITC Workshop

# शालेय अनुबंध

शिक्षण स्नातक द्विवर्षीय अभ्यासक्रमाचा 'शालेय अनुबंध' हा एक अनिवार्य व महत्त्वाचा भाग आहे. प्रथम सत्रात शालेय अनुबंधाचा अवधी ९० तास म्हणजे दोन आठवड्यांचा असावा, असे अभ्यासक्रमात निर्देशित केले आहे. त्यानुसार बी. एड. छात्राध्यापक आपल्या प्रशिक्षणातील एका मोठ्या कालावधीत शाळांमध्ये कार्यरत राहतात.

'शालेय अनुबंध' हा भावी शिक्षकांच्या पूर्वतयारीचा एक अनिवार्य व महत्त्वाचा भाग आहे. या अंतर्गत प्रशिक्षणार्थ्यांना खालील उद्देशाने शालेय प्रणालीचे अवलोकन करणे आवश्यक आहे.

- शाळेला भेट देणे.
- शालेय प्रणालीचे अवलोकन करणे.
- शालेय प्रणालीच्या अवलोकनाअंती त्याचा अहवाल तयार करणे.
- वरील उद्देशांना मूर्तरूप देण्यासाठी खालील बाबींचे अवलोकन करून प्रत्यक्ष वस्तुस्थितीच्या आधारे अहवाल सादर करावयाचा आहे.

१) आकार आणि शाळेची सुरक्षितता

२) सामाजिक परिमाणे

३) शैक्षणिक परिमाणे

४) शालेय सुरक्षा

वरील सर्व मुख्य मुद्यांच्या अंतर्गत येणाऱ्या उपमुद्यांचा सखोल विचार करून मा. प्राचार्य डॉ. मानेकर यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनाने, प्राध्यापक वृंदाच्या सहकार्याने एका मार्गदर्शिकेचे विकसन करण्यात आले.

प्रवेशित छात्राध्यापकांच्या संख्येनुसार एकुण ५ गट करण्यात आले. शाळेतील एकुण विद्यार्थी संख्या लक्षात घेवून तेथील शंभर विद्यार्थ्यांमागे बी. एड चा एक छात्राध्यापक या प्रमाणात विद्यार्थ्यांचे शाळानिहाय गट करण्यात आले. बी. एड. सत्र -I २०१८-२० चे शालेय अनुबंध या उपक्रमाचे आयोजन दि. १५/०१/२०१९ ते २०/०१/२०१९ या कालावधीत करण्यात आले. या उपक्रमासाठी भारत विद्यालय, अकोला, जागृती विद्यालय, अकोला, जिजाऊ कन्या विद्यालय, अकोला, ज्युबिली इंग्लिश हायस्कुल, अकोला व मनुताई कन्या शाळा, अकोला या पाच शाळांची निवड करण्यात आली. छात्राध्यापकांना शाळेत पाठविण्यापूर्वी या उपक्रमाच्या समन्वयक डॉ. संध्या सामुद्रे यांनी दि. ११/०१/२०१९ ते १४/०१/२०१९ या कालावधीत महाविद्यालयात शालेय अनुबंध कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यशाळेत मार्गदर्शिकेच्या आधारे समन्वयक डॉ. संध्या सामुद्रे यांनी शालेय अनुबंध हा भावी शिक्षकांच्या पूर्वतयारीचा अनिवार्य भाग आहे असे सांगितले. त्यासाठी शाळेत सेवेत असणाऱ्या अनुभवी मुख्याध्यापक, शिक्षक, पर्यवेक्षकांच्या सहवासात प्रत्यक्ष कार्य करून शालेय प्रणालीचे अवलोकन करण्याची संधी उपलब्ध होत असून, त्याद्वारे प्रशिक्षणार्थ्यांचे अनुभव विश्व अधिक समृद्ध होते. शालेय इमारत, परिसर, वर्गखोल्या, संसाधनांची उपलब्धता व उपयोग, विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधा, आंतरव्यक्ती संबंधाची गुणवत्ता, विद्यार्थी, मुख्याध्यापक शिक्षक, कर्मचारी,

पालक यांचे समन्यायी वर्तन, अध्यापनाची गुणवत्ता, वर्गव्यवस्था, शिक्षक-विद्यार्थ्यांच्या संपादनाविषयीच्या अपेक्षा, शालेय वेळापत्रक निरीक्षण सहभाग इ. बाबी संबंधी मार्गदर्शन करण्यात आले.

शालेय अनुबंध या उपक्रमात सत्र-I च्या प्रशिक्षणार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभागी होऊन संपूर्ण शालेय प्रणाली समुदायाचे अवलोकन करून निर्धारित वेळेत अहवाल सादर केला.

बी. एड. २०१८-२० सत्र-II चे शालेय अनुबंधाचा अवधी ३० तास म्हणजे पाच दिवसांचा अहे. त्यासाठी दोन दिवसांची कार्यशाळा समन्वयक डॉ. संध्या समुद्रे यांनी महाविद्यालयात घेतली. मार्गदर्शिकेनुसार सर्व बाबींची माहिती विद्यार्थ्यांना दिली. मतावली, प्रश्नावली संबंधी मुलाखती घेण्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. दि. २१/०१/२०१९ ते २३/०१/२०१९ या कालावधीत पाच शाळेत शालेय अनुबंध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सत्र-I साठी घेण्यात आलेल्या शाळेमध्येच संबंधित विद्यार्थ्यांना पाठविण्यात आले. त्यामुळे या विद्यार्थ्यांना सत्र I व II मधील शालेय अनुबंध उपक्रम पुर्णपणे व्यवस्थित करण्याची संधी मिळाली. प्रशिक्षणार्थ्यांसाठी आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेत समन्वयक डॉ. संध्या सामुद्रे यांनी प्रशिक्षणार्थ्यांना वर्गव्यवस्थापन, अनुभवी शिक्षकांच्या अध्यापनाचे निरीक्षण, शालेय समुदायातील मानवी व भौतिक संसाधनाचे महत्त्व आदी संकल्पना व प्रत्यक्ष वस्तुस्थितीचे अवलोकन इत्यादी बाबीसंबंधी मार्गदर्शन केले.

शालेय अनुबंध या उपक्रमात प्रशिक्षणार्थ्यांनी शाळेत जाऊन उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन संपूर्ण वर्गव्यवस्थापन, अनुभवी शिक्षकांच्या अध्यापनाचे निरीक्षण, शिक्षकांच्या मुलाखती, विद्यार्थी, संवाद कौशल्य, अनुभवी शिक्षक वस्तुस्थितीचे अवलोकन करून निर्धारित वेळेत अहवाल सादर केला.

शालेय अनुबंध उपक्रमासाठी वरील शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक सहकार्य लाभले तसेच या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मा. प्राचार्य डॉ. मानेकर यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. वसुधा देव, डॉ. रोहिणी तडस, डॉ. आशा धारस्कर, डॉ. अर्चना वातकर या सर्व प्राध्यापकांचे प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन व सहकार्य मिळाले.

**डॉ. संध्या उद्धव सामुद्रे**

सहाय्यक प्राध्यापक व समन्वयक,

# पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ

शासकीय अध्यापक महाविद्यालय अकोला येथे शिक्षण स्नातक २०१७-१९ या व्दिवर्षीय अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यासाठी पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ दि.१० जानेवारी २०२० शुक्रवार रोजी संपन्न झाला. या समारंभाला महाविद्यालयाच्या प्राचार्या मा.डॉ.वसुधा देव या अध्यक्षस्थानी होत्या. प्रमुख अतिथी म्हणून मा. डॉ.रामेश्वर भिसे, प्राचार्य श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला व्यासपीठावर विराजमान होते. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक भगिनी, समन्वयक डॉ.संध्या सामुद्रे व्यासपीठावर उपस्थित होते. या संपुर्ण समारंभाच्या नियोजन व आयोजनाची जबाबदारी समन्वयक म्हणून डॉ.संध्या सामुद्रे, सहाय्यक प्राध्यापक यांनी सांभाळली. कार्यक्रमाला सुरुवात होण्यापूर्वी पदवीकांक्षीना स्कार्प परिधान करण्यासाठी देण्यात आले. मा. अध्यक्ष, प्रमुख अतिथी व समन्वयक यांना तिलक लावून स्कार्प परिधान करण्यासाठी देण्यात आले.

मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन, सरस्वतीपूजन व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पुजनाने या समारंभाला प्रारंभ झाला. शारदास्तवन कु.वैशाली पांडे व बी.एड. व्दितीय वर्षाच्या विद्यार्थीनींनी गायले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीचे विद्यापीठ गीत सर्वांनी गायले. मान्यवरांचा पुस्तके व गुलाबपुष्प देवून यथोचित सत्कार करण्यात आला. कु.वैशाली पांडे व संच यांनी यावेळी सुरेल स्वरात स्वागत गीत गाऊन सर्वांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. बी.एड. व्दितीय वर्षाची कु.अश्विनी जोशी यांनी मा. प्रमुख अतिथींचा परिचय दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ.संध्या सामुद्रे यांनी केले. समारंभाचा मुख्य भाग पदवीकांक्षीना पदवी प्रदान करण्याचा सोहळा. बी.एड.२०१७-१९ या व्दिवर्षीय अभ्यासक्रमाला एकूण ४५ विद्यार्थी होते. त्यापैकी ४३ विद्यार्थ्यांना Grade A - exemplary मिळाला व सर्वांना B.Ed. ची पदवी प्राप्त झाली. मा.अध्यक्ष व मा.प्रमुख अतिथी यांचे हस्ते या पदवीकांक्षीना पदवी प्रदान करण्यात आली. या समारंभाचे औचित्य साधुन सुरुवातीला बी.एड.२०१७-१९ या दोन वर्षीय अभ्यासक्रमात महाविद्यालयातून प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. प्रथम क्रमांकाच्या मानकरी कु.कल्पना नागमते CGPA ९.१३ व्दितीय क्रमांक प्राप्त कु.मानसी देशमुख CGPA ९.१२ व तृतीय क्रमांक प्राप्त कु.हर्षदा कोरडे CGPA ९.०७ यांना या अतिथींच्या हस्ते पुस्तक देवून गौरविण्यात आले. सर्व पदवीकांक्षीना पदवी वितरीत करण्याचा व प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव करण्याच्या सोहळयाचे सूत्रसंचलन समन्वयक डॉ.संध्या सामुद्रे यांनी केले. हा संपूर्ण समारंभ विद्यापीठातील दीक्षांत सोहळयाच्या रितसर पध्दतीनुसार घेण्यात आला.

मा.प्रमुख अतिथी मा. डॉ.रामेश्वर भिसे यांनी भाषणाव्दारे सर्व पदवीकांक्षीचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. भविष्यातील एक शिक्षक म्हणून सामाजीक जबाबदारी सोबतच चांगली व्यक्ति बनण्याचा प्रयत्न करा. सभोवतालची परिस्थिती व शिक्षण यात समायोजन साधण्याची कला शिक्षकाने आत्मसात करावी असा मोलाचा संदेश त्यांना याप्रसंगी दिला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्या मा.डॉ.वसुधा देव यांनी शिक्षकांची जबाबदारी,

सामाजिक जाणीव आणि उद्याचे आव्हाने यावर प्रकाश टाकला.

याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ.रोहिणी तडस, डॉ.आशा धारस्कर, डॉ.अर्चना वातकर, ग्रंथपाल डॉ. संकेत राऊत, सर्व कार्यालयीन कर्मचारी, बी.एड.प्रथम वर्ष व व्दितीय वर्षातील विद्यार्थी व अतिथी पालक उपस्थित होते. या समारंभाचे संचलन सांस्कृतिक प्रतिनिधी (बी.एड. व्दितीय वर्ष) कु.अश्विनी घुसरकर यांनी केले तर कु.मेघा धनोकार यांनी सर्वांप्रती ऋण व्यक्त केले. यानंतर कु.वैशाली पांडे यांना गायलेल्या पसायदानाने समारंभाची सांगता झाली. संपूर्ण कार्यक्रमाच्या तयारीसाठी व्दितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

यानंतर सर्वांनी अल्पोपहाराचा आस्वाद घेतला. महाविद्यालयातील हा दुसरा पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ महाविद्यालयातील प्राचार्य, सर्व प्राध्यापक, ग्रंथपाल, कार्यालयीन कर्मचारी व बी.एड.प्रथम व व्दितीय वर्षाचे विद्यार्थी या सर्वांच्या सहकार्याने व साक्षीने संपन्न झाला. समन्वयक म्हणून मी सर्वांना धन्यवाद देते व सर्वांप्रती ऋण व्यक्त करते.

**डॉ.संध्या यु. सामुद्रे**

समन्वयक

पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ

परीक्षा विभाग

# सांस्कृतिक कार्यक्रम अहवाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला येथे आज दि.२९.८.२०१९ रोजी सभेचे आयोजन करण्यात आले होते. MHRD च्या सुचनेनुसार महाविद्यालयात खालीलप्रमाणे जलशक्ती अभियान समितीची स्थापना करण्यात आली.

१. डॉ.वसुधा देव – अध्यक्ष

२. डॉ.रोहीणी तडस – समन्वयक

३. डॉ.अर्चना वातकर – सदस्य

४. डॉ.आशा धारस्कर – सदस्य

५. डॉ.संध्या सामुद्रे – सदस्य

६. श्री.रावत/ऐश्वर्या गवई – सदस्य

७. कु.राखोंडे/ निकीता जाधव – सदस्य

८. रवींद्र कोहळे/ निकीता उगले – सदस्य

९. विद्या पारख/नम्रता मुनीस – सदस्य

सध्या छात्रसेवाकाळ सुरु असल्यामुळे शाळांमधून कार्यक्रम घेण्याचे निश्चित झाले. कार्यक्रम खालीलप्रमाणे:–

१. प्रभात किड्स – Plastic Bag (Activity) save tree save earth (Drama)

2. मनुताई कन्या शाळा – 1) Save water (पोस्टर स्पर्धा) 2) Rain water harvesting –व्याख्यान.

३. New English - 1) Plastic ban वक्तृत्व स्पर्धा

२) Save water निबंध स्पर्धा

४. जिजाऊ कन्या शाळा–

1) Water Conservation वादविवाद

२) Water Recycling व्याख्यान.

त्याचप्रमाणे महाविद्यालयात दि.७ सप्टेंबर २०१९ शनिवार रोजी 'जलसंधारण' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

ह्याचप्रमाणे विविध शाळांमधून ठरविण्यात आलेले सर्व कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थ्यांनी केले होते. समितीतील उपस्थित विद्यार्थी

१. निकीता जाधव

२. नम्रता मुनीस

३. रवींद्र कोहळे

४. निकीता उगले

५. रुपाली राखोंडे

६. आकाश रावत

७. ऐश्वर्या गवई

८. विद्या पारख

९. चेतन इंगळे

आज दि.३.१.२०२० रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय येथे सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचालन आकाश सिंग नेरवैय्या यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ.वसुधा देव (प्राचार्य) यांनी स्वीकारले. कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून डी. व्ही. आंबेकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ.वातकर होत्या व डॉ. तडस ह्या होत्या. श्री.डी.व्ही.आंबेकर यांनी उत्तम मार्गदर्शन केले. विद्यार्थी वर्गाशी संवाद साधला. बी.एड.च्या सर्व प्रशिक्षणार्थींना उत्तम मार्गदर्शन केले. सावित्रीबाई फुले जयंती नीमीत्त विकास खंडारे अश्विनी अंभोरे यांनी भाषण केले तर प्रणोती गेडाम व ग्लोरी खाडे यांनी ओवी सादर केली.

बी.एड.भाग २ च्या प्रशिक्षणार्थींना समुह गीत सादर केले. काही प्रशिक्षणार्थींना (घुसरकर, कोहळे)

यांनी सावित्रीबाई व जोतीबा फुले यांच्या जीवनातील एक प्रसंग नाटिकेच्या माध्यमातून सादर केला. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन बी.एड.भाग २ ची छात्राध्यापिका मेघा धनोकार हिने केले. या कार्यक्रमाला सर्व प्राध्यापकवृंद उपस्थित होते.

आज दि.१४.१.२०20 रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय अकोला येथे माँ जिजाऊ जयंती, स्वामी विवेकानंद जयंती व मकरसंक्रांती उत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचालन चेतन नागे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.वसुधा देव यांनी स्वीकारले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्री.अक्षय राऊत उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ.वातकर होत्या.

प्रमुख अतिथी श्री.अक्षय राउत यांनी माँ जिजाउ व स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर प्रकाश टाकला. जिजाऊ मातेने छत्रपती शिवाजीवर केलेले संस्कार व स्वामी विवेकानंद यांच्या विचारातील युवा यावर सुध्दा प्रकाश टाकला. जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमीत्त स्नेहा तळोकार व विशाल बुंदेले (बी.एड.भाग १) यांनी भाषण केले. बी.एड.भाग २ च्या प्रशिक्षणार्थ्यांनी समुह गीत सादर केले. तर सपना शिरसाट व श्रीकृष्ण गोपनारायण यांनी जिजाऊ व स्वामी विवेकानंदाची भूमिका साकारली. बी.एड.भाग २ ची छात्राध्यापिका कु. मंजुषा तेलगोटे हिने मकरसंक्रांती उत्सव साजरा करण्याची पार्श्वभूमी सांगितली. या कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक उपस्थित होते. आभारप्रदर्शन पंकज मावस्कर यांनी केले.

शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला येथे दि.२१ जून २०१९ शुक्रवार रोजी आंतरराष्ट्रीय योगा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या दिवसासाठी यशवंतराव चव्हाण महाविद्यालय मुक्त विद्यापीठाचे (२०१८-२०) चे विद्यार्थी तसेच सत्र २०१८-२० चे नियमित विद्यार्थी असे एकूण ३५ जण उपस्थित होते तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून निलीमा पाटील ह्या उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांकडून विविध आसन करुन घेतले व त्याचे महत्व सांगितले. तसेच प्राणायामाचा पण अभ्यास करवून घेतला या योगा दिवसासाठी महाविद्यालयातील प्राचार्य, सर्व प्राध्यापकवृंद व कार्यालयीन कर्मचारी उपस्थीत होते. संबंधित कार्यक्रमाचे व्हिडीयो, फोटो सचिव युजीसी यांचेकडे पाठविण्यात आले.

शासकीय अध्यापक महाविद्यालय अकोला येथे आज दि.१६.८.२०१९ शुक्रवार रोजी रक्षाबंधनानिमित्त वृक्ष रक्षाबंधनचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महावीद्यालयाच्या प्राचार्या डॉ.व. वि.देव मॅडम उपस्थित होत्या. कार्यक्रमामध्ये वर्गातील सर्व विद्यार्थिनींनी वर्गातील विद्यार्थ्यांना राख्या बांधल्या. तसेच वृक्षाचे संवर्धन व्हावे या दृष्टीकोनातून वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील सर्व कुंडयांना राख्या बांधल्या. निसर्गाचे संवर्धन व संरक्षण करणे ही जबाबदारी आहे हे मत मा.प्राचार्य यांनी अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचालन कु.अश्विनी घुसरकर हिने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.तडस सांस्कृतिक कार्यक्रम समन्वयक यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

**प्रा. डॉ. रोहिणी तडस**

समन्वयक, सांस्कृतिक विभाग

# परीक्षा विभाग अहवाल

परीक्षा हा व्दिवर्षीय स्नातक अभ्यासक्रमाचा एक महत्वपूर्ण भाग आहे. अभ्यासक्रमानुसार असलेल्या दोन वर्षाच्या कालावधीत एकूण चार सत्रात अभ्यासक्रम विभागलेला आहे. या अंतर्गत घ्याव्या लागणा-या परीक्षा व संबंधित अंतर्गत मूल्यांकनाबाबत वेळोवेळी व व्यवस्थित कार्यवाही होण्याच्या दृष्टीने महाविद्यालयात परीक्षा विभाग कार्यरत आहे. या परीक्षा विभागाच्या समन्वयक म्हणून प्रा.डॉ.संध्या सामुद्रे या संपूर्ण कार्यभार सांभाळतात.

व्दिवर्षीय बी.एड.अभ्यासक्रमात सत्र पध्दती असून एकूण चार सत्र आहेत. प्रत्येक सत्रामध्ये विषयासाठी गुण व प्रात्यक्षिक गुण निश्चित दिलेले आहेत. प्रत्येक सत्रात विषयाशी संबंधीत आदेशीत कार्य, चर्चा सत्र, दोन घटक चाचण्या आणि उपक्रम असे सत्र कार्य आहे. याशिवाय प्रत्येक सत्रात विविध प्रात्यक्षिक आहेत. हे सर्व सत्र कार्य अभ्यासक्रमात दिलेल्या तासानुसार राबविण्यात येते. प्रत्येक विषयाचे चर्चासत्र विद्यार्थ्यांचे समान गटात विभाजन करुन नियोजीत वेळापत्रक तयार करुन त्यानुसार घेतले जातात. प्रत्येक गटात एक मार्गदर्शक प्राध्यापक असतात. वेळापत्रकानुसार विद्यार्थी चर्चासत्र सादरीकरण करतात. विद्यार्थ्यांना आदेशीत कार्य दिले जाते. नियोजित वेळापत्रक तयार करुन त्यानुसार विद्यार्थ्यांच्या दोन घटक चाचण्या घेतल्या जातात. चर्चासत्रासाठी प्रत्येक विषयाचे प्राध्यापक विद्यार्थ्यांना विविध विषय देतात. त्यानुसार प्रत्येक विद्यार्थी स्वत:च्या विषयाशी तयारी करुन पध्दतशीर व योग्य सादरीकरण करतात. या सर्व सत्र कार्यासाठी विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते. दिलेल्या वेळेत विद्यार्थी संबंधित कार्य पुर्ण करतात व संबंधित सर्व अहवाल व्यवस्थित लिहून वह्या जमा करतात.

प्रत्येक सत्रात घ्यावयाच प्रात्यक्षिक कार्य वेगवेगळे दिलेले आहे. दिलेल्या एकूण तासानुसार प्रत्येक प्रात्यक्षिकांचे आयोजन संबंधित प्राध्यापक वेळोवेळी करतात. या संपूर्ण कार्यासंबंधीच्या वह्या महाविद्यालयातर्फे तयार करवून घेतल्या जातात व त्या विद्यार्थ्यांना देण्यात येतात. परीक्षा विभागांतर्गत सर्व विषयांशी संबंधीत सत्र कार्य व प्रात्यक्षिक यांचे आयोजन नियोजित वेळी होण्याच्या दृष्टीने वेळोवेळी सुचना काढल्या जातात. घटक चाचणीचे वेळापत्रक, पर्यवेक्षण वेळापत्रक, सत्र कार्यासंबंधी सर्व सुचना, सेमीनार सादरीकरण व विद्यार्थी गट विभाजन वेळापत्रक वेळोवेळी तयार करुन सर्व कार्य वेळेत पूर्ण केले जाते. विद्यार्थी नियोजीत वेळापत्रकानुसार व सुचनेनुसार सर्व कार्य वेळेत पार पाडतात. अंतर्गत मूल्यांकन हा बी.एड.अभ्यासक्रमाचा अविभाज्य व अत्यंत महत्वाचा भाग आहे. त्यासाठी सत्र १, सत्र २, सत्र ३ व सत्र ४ या चारही सत्राशी संबंधित मूल्यांकन याद्या तयार करुन प्राध्यापकांना वितरित केल्या जातात. सर्व प्राध्यापक मूल्यांकन याद्या निर्धारित वेळेत परीक्षा विभागाकडे जमा करतात. त्यानुसार अंर्गत मूल्यांकन निर्धारीत वेळेत विद्यापीठात जमा केले जाते. परीक्षा विभागाचे हे संपूर्ण कार्य सातत्याने चालू असते. हे कार्य यशस्वीपणे व सुरळीतपणे होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. वसुधा देव यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ.रोहीणी तडस, डॉ.अर्चना वातकर, डॉ.आशा धारस्कर या सर्व प्राध्यापकांचे वेळोवेळी सहकार्य व मोलाचे मार्गदर्शन लाभले.

यावर्षी दीक्षांत समारंभाचे आयोजन परीक्षा विभागातर्फे करण्यात आले.

**डॉ.संध्या उध्दव सामुद्रे**

सहा.प्राध्यापक व समन्वयक परीक्षा विभाग.

# IQAC विभागाचा अहवाल
# २०१९-२०

विभागातर्फे दि. १७/१२/२०१९ रोजी सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेत IQAC ची नव्याने स्थापना करण्यात अी व खटअउ समितीच्या कार्याचे नियोजन करण्यात आले. या सभेत नव्याने घोषीत करण्यात आलेली कार्यकारिणी पुढील प्रमाणे आहे.

**अध्यक्ष :** मा. प्राचार्य

**प्राध्यापक प्रतिनिधी :** महाविद्यालयातील सहाय्यक/सहयोगी प्राध्यापक

**व्यवस्थापन सदस्य :** मा. सहसंचालक

प्रशासकीय कार्यकारी अधिकारी : श्री. अनिल तसरे (मुख्यलिपीक)

**आजी व माजी विद्यार्थी प्रतिनिधी :**

१) डॉ. संकेत राऊत

२) डॉ. महेश डाबरे

३) डॉ. श्रीकांत उखळकर

१) विकास खंडारे (प्रथम वर्ष)

२) सुनिल मस्की (द्वितीय वर्ष)

**कर्मचारी**

डॉ. आशिष राऊत

डॉ. शांताराम बुटे

**उद्योगपती**

श्री. गोपालजी खंडेलवाल

डॉ. वर्षा पाठक

**समाजसेवक**

श्री. किशोर बुटोले

**समन्वयक :** डॉ. आशा धारस्कर (सहाय्यक प्राध्यापक)

महाविद्यालयातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. वसुधा देव, सहयोगी प्राध्यापक यांचेकडे प्राचार्य पदाचा प्रभार डॉ. आशा धारस्कर, सहाय्यक प्राध्यापक यांचेकडे सोपविण्यात आला. त्याबद्दल अभिनंदनाचा ठराव घेण्यात आला. IQAC विभागाची दुसरी सभा स्टाफ कौन्सील संदर्भात दि. ३० डिसेंबर २०१९ रोजी घेण्यात आली. या सभेत नॅक संदर्भात चर्चा करण्यात येवून संबंधीत कार्याची विभागणी करण्यात आली.

दि. १ जानेवारी २०२० रोजी सर्व प्राध्यापकवृंदाना नॅक क्रायटेरीयाची प्रत देण्यात येऊन त्या अनुषंगाने कार्यनियोजन तयार करण्याविषयी सुचित करण्यात आले.

दि. १० जानेवारी २०२० रोजी IQAC विभागात महाविद्यालयातील प्राध्यपकांची सहविचार सभा आयोजित करण्यात आली. या सभेत प्राध्यापकांचा आपल्याकडील क्रायटेरियाचे कार्यनियोजन सभेत सादर केले. मा. प्रभारी प्राचार्य यांनी कार्यनियोजना संदर्भात मार्गदर्शन केले.

दि. २१ जानेवारी २०२० रोजी IQAC मार्फत राष्ट्रीय चर्चासत्र आयोजीत करण्याच्या दृष्टीने सभेचे आयोजन करण्यात आले. त्या दृष्टीने सभेत राष्ट्रीय चर्चासत्राची तारिख निश्चित करण्यात आली. तसेच IQAC च्या नविन कार्यकारिणीची सभा घेण्याचे निश्चित करण्यात आले. या सभेत प्राध्यापकवृंदानी नॅक संदर्भात करित असलेल्या कार्याचा आढावा क्रायटेरिया नुसार सभेत सादर केला. तसेच माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला.

दि. ४ फेब्रुवारी २०२० रोजी सर्व प्राध्यापक वृंद आणि IQAC रोजी सर्व प्राध्यापकवृंद आणि IQAC कार्यकारणी सदस्य यांच्या सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले. सदर सभेत समिती समोर नॅक चे कार्यनियोजन सादर करण्यात आले व त्यास समितीची मान्यता घेण्यात आली तसेच राष्ट्रीय चर्चासत्राच्या

आयोजनाविषयी चर्चा करण्यात आली. कार्यकारणी सदस्यांनी महाविद्यालयात नाविण्यपुर्ण उपक्रम राबविण्या संदर्भात मार्गदर्शन केले.

दि. १८ मार्चपासुन कोव्हीड-१९ चा वाढता प्रादुर्भाव घोषीत करण्यात आला. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मनात कोरोनाविषयीचे दडपण, संभ्रमावस्था या विषयीचा सुप्त ताण जाणवत होता. या सर्वांचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शारिरीक, मानसिक आरोग्यासाठी धोकादायक आहे हे लक्षात घेऊन IQAC विभागातर्फे २८ में २०२० रोजी ताणतणावाचे व्यवस्थापन या विषयावर ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले. तसेच कोव्हिड-१९ विषयक जाणिव जागृति अभियान अंतर्गत विद्यार्थी, पालक, शिक्षक, समाज या घटकांसाठी प्रश्नमंजुषा आयोजीत करण्यात आली.

महाविद्यालयीन गुणवत्ता विकासनासोबतच प्राध्यापकांच्या संशोधनात्मक विकासासाठी IQAC विभागातर्फे दि. ०९ जुन २०२० गुरूवार रोजी 'रिसर्च इन इंटर डिसीप्लनरी स्टडीज' या विषयावर एक दिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. या ई-चर्चासत्रांतर्गत एकुण २०५ शोध निबंधाच्या समावेश असलेले आयएसएसएन प्राप्त व इम्पॅक्ट फॅक्टर प्रमाणित पीर रिव्हुड जर्नल 'विद्यावार्ता' हे सोवेनियर प्रकाशीत करण्यात आले.

शैक्षणिक सत्र २०१९-२० मध्ये महाविद्यालयाच्या गुणवत्ता विकसनासाठी मा. प्राचार्यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनानुसार महाविद्यालयातील प्राध्यापकांनी विविध उपक्रम राबविले.

**डॉ. आशा धारस्कर**
समन्वयक, IQAC विभाग

---

## छात्रसेवाकाळ कार्यशाळा अहवाल
## २०१९-२०

संगाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत बी.एड. द्वितीय वर्ष सत्र-३ च्या प्रशिक्षणार्थींसाठी छात्रसेवाकाळ कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना दि. २२ जुलै ते २७ जुलै २०१९ या कालावधीत संपन्न झालेल्या या कार्यशाळेत छात्रसेवाकाळासाठी उद्‌बोधन करण्यात आले. या उद्‌बोधनांतर्गत पाठनियोजन, पाठनिरीक्षण, घटक नियोजन, घटक चाचणी, मुल्यमापन विविध सहशालेय व अभ्यासेत्तर कार्यक्रम, उपक्रम तसेच शालेय दस्तऐवज. अशा विविधांगी विषयावर तज्ञ मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले. श्री. भिमसिंग राठोड, डॉ. जितेंद्र काठोळे, डॉ. अर्चना वातकर, डॉ. संध्या सामुद्रे, डॉ. आशा धारस्कर यांनी तज्ञ मार्गदर्शक म्हणुन कार्य केले. तसेच छात्रसेवाकाळ समन्वयक डॉ. धारस्कर यांनी प्रशिक्षणार्थींना कार्यशाळेची व संपूर्ण छात्रसेवाकाळाची रुपरेषा स्पष्ट केली.

प्रस्तुत कार्यशाळेची उद्‌घाटन मा. प्र. प्राचार्य डॉ. वसुधा देव यांनी केले व मा. प्राचार्यांच्या प्रेरणेने व समन्वयक डॉ. धारस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली छात्रसेवाकाळ कार्यशाळा संपन्न झाली.

कार्यशाळेसाठी तज्ञ मार्गदर्शक म्हणुन कार्य करणाऱ्या सर्व तज्ञांचे मन:पूर्वक आभार तसेच मा. प्राचार्यांच्या प्रति ऋणनिर्देश.

**डॉ. आशा धारस्कर**
समन्वयक छात्रसेवाकाळ

# छात्रसेवाकाळ अहवाल
## २०१९-२०

संगाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत बी.एड. द्वितीय वर्ष सत्र-३ च्या प्रशिक्षणार्थीसाठी अभ्यासक्रमातील महत्वपूर्ण भाग म्हणजे छात्रसेवाकाळ या वर्षात बी.एड. प्रशिक्षणार्थीच्या छात्रसेवाकाळ दि. १९ ऑगस्ट ते ०४ ऑक्टो. २०१९ या कालावधीत आयोजीत करण्यात आला. प्रस्तुत छात्रसेवाकाळ पूर्ण करण्याच्या दृष्टीने महाविद्यालयाच्या लॅब स्कुल जिजाऊ कन्या विद्यालय, प्रभात किड्स् स्कुल, न्यु इंग्लिश हायस्कुल व मनुताई कन्या शाळा येथे छात्रसेवाकाळाचे आयोजन करण्यात आले. त्यासाठी रितसर संबंधीत शाळेच्या मा. मुख्याध्यापकांची परवानगी घेण्यात आली. शाळांच्या वेळेनुसार पुर्णवेळ शाळेत उपस्थित राहून तेथील मार्गदर्शक शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली छात्रसेवाकाळांतर्गत पूर्ण करावयाचे संपूर्ण प्रात्याक्षिक कार्य, उपक्रम कार्यक्रम प्रशिक्षणार्थीनी पुर्ण केले. दि. १६ /०८/२०१९ रोजी प्रशिक्षणार्थीची न्यु इंग्लिश हायस्कुल तसेच प्रभात किड्स् स्कुल येथे मार्गदर्शक शिक्षकांसोबत सभा आयोजित करण्यात आली होती. दि. १९ ऑगस्ट पासून सुरू होणाऱ्या छात्र सेवाकाळ संदर्भात प्रशिक्षणार्थीना मार्गदर्शन करण्यात आले.

दि. २२,२३ व २४ ऑगस्ट २०१९ या कालावधीत बंगलोर येथील आशा फाऊंडेशन तर्फे प्रभात किड्स स्कुल, अकोला येथे आयोजीत 'किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या समस्येवरील उपाययोजना' या विषयावर प्रशिक्षणार्थीना छात्रसेवाकाळ अंतर्गत मार्गदर्शन करण्यात आले. दि. १९ ऑगस्ट २०१९ ते ०४/१०/१९ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या छात्रसेवाकाळांतर्गत पुढील तक्त्यात निर्देशीत केल्यानुसार गट प्राध्यापकांनी प्रशिणार्थींना सरावपाठ, पाठनिरीक्षण, घटक नियोजन, घटक चाचणी, मुल्यमापन प्रक्रिया, अभ्यासपुरक व अभ्यासेत्तर उपक्रम, शालेय दस्तऐवज, परीक्षा, कृति संदेश अशा विविध प्रात्याक्षिकांबाबत मार्गदर्शन केले व छात्रसेवाकाळांतर्गत निर्माण होणाऱ्या समस्या व अडचणींचे निराकरण केले. दि. १२/०९/२०१९ रोजी न्यु इंग्लिश हायस्कुल, अकोला येथे छात्रसेवाकाळ अंतर्गत येणाऱ्या अडचणी व समस्यांचा आढावा घेऊन त्यावर योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी छात्रसेवाकाळ समन्वयक डॉ. आशा धारस्कर यांनी समस्या जाणून घेतल्या व त्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले.बी.एड द्वितीय वर्ष सत्र -४ करिता दि. १६ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०१९ या कालावधीत छात्रसेवाकाळाचे आयोजन करण्यात आले. यासाठी लॅब स्कुल म्हणुन महाराष्ट्र विद्यालय, ज्युबिली हायस्कुल व जागृती विद्यालय ह्या शाळा उपलब्ध करुन देण्यात आल्यात. ज्युबिली इंग्लीश हायस्कुल येथे डॉ. रोहीनी तडस, महाराष्ट्र विद्यालयात डॉ. वसुधा देव व डॉ. आशा धारस्कर तर जागृती विद्यालयात डॉ. अर्चना वातकर व डॉ. संध्या सामुद्रे यांनी गटप्राध्यापक म्हणून कार्य केले व बी.एड प्रशिक्षणार्थीना छात्रसेवाकाळ संदर्भात मार्गदर्शन करुन त्यांच्या कार्याचे निरीक्षण व मुल्यमापन केले.दि. ०६ ते ०८ फेब्रुवारी २०२० या कालावधीत संगाबा, अमरावती विद्यापीठ, अमरावतीच्या आदेशान्वये अंतिमपाठ प्रात्यक्षिक परिक्षेचे आयोजन करण्यात आले. सदर परीक्षेचे स्वरुप संयुक्त मौखिक परीक्षा व दोन अध्यापन पद्धतीचे प्रत्येकी एक एक पाठ असे होते. दि. ०३ ते ०५ फेब्रुवारी २०२० या कालावधीत

परीक्षा मर्गादर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत संयुक्त मौखिक परीक्षेविषयी उद्बोधन डॉ. धारस्कर यांनी केले. गट प्राध्यापकांनी पाठाविषयी मार्गदर्शन करून शैक्षणिक साहित्याचा वापर करण्याच्या दृष्टीने योग्य त्या सुचना केल्या सदर परीक्षेसाठी दोन अंतर्गत व दोन बहिस्थ परीक्षक उपस्थित होते.

संपूर्ण शैक्षणिक वर्षातील छात्रसेवाकाळ अंतर्गत मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापक वृंद, शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे प्रति आभार. ज्यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली छात्रसेवाकाळाचे आयोजन केले जाते अशा मा.प्र.प्राचार्य डॉ. वसुधा देव यांच्या प्रति ऋण व्यक्त करते.

**डॉ. आशा धारस्कर**
समन्वयक छात्रसेवाकाळ

## वेबिनार : ताणतणावाचे व्यवस्थापन

१८ मार्चपासून कोव्हिड-१९ ( कोरोना) चा वाढता प्रादुर्भाव पहाता सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाकडून लॉकडाऊन घोषित करण्यात आला. जवळपास आज अडिच ते तिन महिण्यापासून प्रत्येक व्यक्ती एका अनामिक भितीच्या छायेत वावरत असताना दिसून येत आहे. याला विद्यार्थी सुध्दा अपवाद नाही. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मनात परीक्षेविषयीचा संभ्रम, भविष्यातील अनिश्चितता, कोरोणाविषयीचे दडपण याविषयाचा सुप्त ताण जाणवतो आहे.आणी या सर्वांचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शारिरीक, मानसिक आरोग्यासाठी धोकादायक आहे, हे लक्षात घेऊन

अकोला येथील शासकीय अध्यापक महाविद्यालयाच्या वतीने दि.२८/५/२०२० गुरुवार रोजी ताणतणावाचे व्यवस्थापन या विषयावर ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. वेबिनारच्या समन्वयक ,प्रा.डॉ.आशा धारस्कर यांनी गुगल मिटच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या वेबिनार अंतर्गत प्रास्ताविकेतुन संबंधित विषयाची आवश्यकता स्पष्ट केली. तर तज्ञ मार्गदर्शक डॉ. महेश डाबरे यांनी ताण कसा घालवावा,, कोणते छंद जोपासायला पाहिजे, ताणाचे व्यवस्थापन कसे करावे याविषयी विविध दाखले देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या प्राचार्या, डॉ. वसुधा विनोद देव यांनी विद्यार्थ्यांना आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांनी हतबल न होता आपले आत्मबल वाढवून मानसिक स्वास्थ्य कसे टिकून ठेवावे याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले.वेबिनार मध्ये महाविद्यालयातील बि.एड्.प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी, पीएच.डी. कोर्सचे विद्यार्थी तसेच सर्व प्राध्यापक वृंद व कार्यालयीन कर्मचारी सहभागी झाले होते.वेबिनारसाठी तंत्र सहाय्यक म्हणून कु.गार्गी आल्हाद भावसार हीचे सहकार्य लाभले.अशा मार्गदर्शनाची विद्यार्थ्यांसाठी नितांत आवश्यकता होती अशा प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी यावेळी दिल्यात.डॉ.आशा धारस्कर यांनी शेवटी सर्वांचे आभार व्यक्त केले.

**डॉ. आशा धारस्कर**
समन्वयक

# राष्ट्रीय चर्चासत्र अहवाल
## २०१९-२०

कोव्हिड-१९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाने व युजीसीने महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठी वर्क फ्रॉम होम ही संकल्पना कार्यान्वित केली.त्याअनुषंगाने महाविद्यालयीन गुणवत्ता विकसनासोबतच प्राध्यापकांच्या संशोधनात्मक विकासासाठी शासकीय अध्यापक महाविद्यालय ( सीटीई ) अकोला तर्फे दि.९ जून २०२० गुरुवार रोजी रिसर्च इन इंटरडिसीप्लीनरी स्टडीज' या विषयावर एक दिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. सुरवातीला राष्ट्रीय परिषदेच्या समन्वयक डॉ. आशा धारस्कर – भावसार यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयाचा परिचय व परिषदेच्या आयोजना मागील उद्देश स्पष्ट केला.तद्वतच महाविद्यालयाच्या प्राचार्य मा.डॉ.वसुधा देव यांनी सर्व अतिथीगणांचा परिचय देऊन आपले स्वागतपर मनोगत व्यक्त केले.तसेच या परिषदेच्या निमित्ताने संपूर्ण भारतातुन संशोधकांनी पाठविलेल्या १८५ शोधनिबंधाचा समावेश असलेले विद्यावार्ता या आयएसएसएन क्र.प्रमाणित व ७.०४१ इम्पॅक्ट फॅक्टर असलेल्या नियतकालिकाचे या परिषदेत विमोचन करण्यात आले. या परिषदेला मा. डॉ. धनराज माने साहेब (शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे) यांनी शूभेच्छा संदेश देऊन परिषदेच्या यशस्वीतेसाठी सदिच्छा दिल्यात.या परिषदेला उद्घाटक म्हणुन लाभलेल्या डॉ. शशी वंजारी, कुलगुरू, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई यांनी आपल्या मनोगतात मराठी भाषेचे संरक्षण व संवर्धन करण्याची आज नितांत गरज असतांनाच महाविद्यालयाने राष्ट्रीय स्तरावरील परिषदेचे आयोजन व नियोजन मराठी भाषेतून करावे हे खरोखरच अभिमानास्पद असुन मराठी च्या संवर्धनासाठीची ही एक यशस्वी वाटचालच नव्हे तर राज्यभाषेच्या संरक्षणासाठी उचलेले एक यशस्वी पाउल आहे.असे विचार व्यक्त केले. दुसऱ्या सत्राचे सुत्रसंचालन व आभार डॉ. अर्चना वातकर यांनी केले.या सत्रात डॉ. गजानन गुल्हाने, (विभागप्रमुख, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, सं.गा.बा.अमरावती विद्यापीठ,अमरावती) यांनी आपल्या बिजभाषणातुन सद्यस्थितीत आंतरविद्याशाखीय संशोधनाची गरज का आहे,,संशोधनात कोणते मुलभूत बदल होणे आवश्यक आहे व हे बदल कोणत्या स्वरूपात व्हावे यावर अतिशय अभ्यासपुर्ण विवेचन केले. तसेच परिषदेच्या तिसऱ्या सत्राचे सुत्रसंचालन डॉ. संध्या साखरे यांनी केले.या सत्रात एक्सपर्ट सेशनला अध्यक्ष म्हणून लाभलेल्या डॉ. संजीवनी मुळे, (माजी अधिष्ठाता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद)ह्या उपस्थित होत्या. त्यांनी तज्ञ मार्गदर्शक डॉ. महेश डाबरे ( सहयोगी प्राध्यापक,एल.आर.टी.महाविद्यालय, अकोला) व डॉ. अल्पना दुभाषे ( प्रोफेसर,शासकीय माधव कला महाविद्यालय, उज्जैन, मध्यप्रदेश )यांनी केलेल्या मार्गदर्शनावर भाष्य करून आंतरविद्याशाखीय संशोधनाचे विभाग व प्रत्येक विभागात होत असलेल्या संशोधनाचे प्रमाण किती व कसे आहे याविषयी महत्वपूर्ण माहिती दिली.

परिषदेच्या समारोपीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रोहिणी तडस यांनी केले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा मा.कविता साळुंके ( प्रोफेसर व संचालक शिक्षणशास्त्र विभाग, य.च.म.मु.वि.नाशिक) यांनी कृतीसंशोधनातील विविध आयाम स्पष्ट करून हे संशोधन गृहिणींपासुन तर सर्वच क्षेत्रातील व्यक्ती करू शकतात. असे मौलिक विचार समारोप प्रसंगी व्यक्त केले.

तसेच परिषदेच्या समन्वयक डॉ. आशा धारस्कर-भावसार यांनी परिषदेला उपस्थित सर्व विद्वत जनांचे व सर्व सहकारी प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर वर्ग, कार्यालयीन कर्मचारी तसेच प्रशिक्षणार्थी आणी सर्व सहभागींचे आभार मानले.सदर राष्ट्रीय परिषदेत संपूर्ण भारतातुन १५०० च्या वर प्राध्यापक, संशोधक झुम ॲप व युट्यूब च्या माध्यमातून सहभागी झाले होते.परिषदेच्या यशस्वितेसाठी प्राचार्या, डॉ. वसुधा देव, समन्वयक डॉ. आशा धारस्कर– भावसार तसेच संयोजन समितीतील सर्व सदस्यांचे मनःपूर्वक अभिनंदन..

**डॉ.आशा धारस्कर-भावसार**
राष्ट्रीय परिषद समन्वयक

# अहवाल
# २०२०-२१

# क्षणचित्र



वाचन-परावर्तीत विषय वस्तू कार्यशाळेचे आयोजन



खिसमस नाताळ निमीत्त कार्यक्रमाचे आयोजन



वाचन-परावर्तीत विषय वस्तू कार्यशाळा



खिसमस नाताळ साजरा करतांना प्रशिक्षणार्थी



ग्रंथालयाचे निरीक्षण करतांना डॉ. केशव तुपे, शिक्षण सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती व मा. प्र. प्राचार्य डॉ. वसुधा देव



स्वच्छता अभियान राबवितांना प्राध्यापक व प्रशिक्षणार्थी

# क्षणचित्रे



शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा उद्घाटन करतांना मा. प्र. प्राचार्य डॉ. वसुधा देव



शालेय अनुबंध कार्यशाळा उद्घाटन समारोह प्रसंगी उपस्थित मान्यवर




गटचर्चासत्राचे आयोजन



सूक्ष्म अध्यापन पद्धती कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मा. प्र. प्राचार्य डॉ. वसुधा देव व उपस्थित मान्यवर



शाडूमातीपासून गणपती निर्मिती कार्यशाळा समन्वयक मा. प्र. प्राचार्य डॉ. वसुधा देव व मार्गदर्शक कु. शितल वानखडे



माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती निमीत्त व्याख्यानाचे आयोजनाप्रसंगी प्रमुख अतिथी यांचे स्वागत करतांना मा. प्र. प्राचार्य डॉ. वसुधा देव

# क्षणचित्रे



डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमीत्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित मान्यवर



२५ डिसेंबर रोजी आयोजित नाताळ दिनानिमीत्त आयोजित कार्यक्रमात उपस्थि मान्यवर तथा प्र.प्राचार्य डॉ. वसुधा देव



टीईटी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा उद्घाटन प्रसंगी मा. प्र.प्राचार्य डॉ. वसुधा देव यांचे स्वागत करतांना समन्वयक डॉ. अर्चना वातकर



शालेय अनुबंध कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मा. प्र. प्राचार्य डॉ. वसुधा देव व उपस्थित मान्यवर



माजी विद्यार्थी मेळावा प्रसंगी प्रमुख अतिथी डॉ. गजानन नारे व मा. प्र. प्राचार्य डॉ. वसुधा देव तथा माजी विद्यार्थी



शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळेप्रसंगी मार्गदर्शक व प्रशिक्षणार्थी

# क्षणचित्रे



मनुताई कन्या शाळा अंतर्गत छात्र सेवाकाळ
प्रसंगी बी.एड्. प्रशिक्षणार्थी ,
मार्गदर्शक डॉ. अर्चना वातकर व डॉ. संध्या सामुद्रे



छात्र सेवाकाळ करीता प्रसंगी बी.एड्. प्रशिक्षणार्थींना
शुभेच्छा देतांना समन्वयक डॉ. आशा धारस्कर



ज्युबिली इंग्लिश हायस्कुल अंतर्गत छात्र सेवाकाळ
प्रसंगी बी.एड्. प्रशिक्षणार्थी व शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक



सावित्रीबाई फुले जि.प. कन्या शाळा अंतर्गत छात्र सेवाकाळ
प्रसंगी बी.एड्. प्रशिक्षणार्थी शालेय विद्यार्थ्यांना
मार्गदर्शन करतांना



आय. सी. टी. प्रात्यक्षिक करतांना बी.एड्. प्रशिक्षणार्थी



संविधान दिनानिमीत्त प्रतिज्ञा घेतांना बी.एड्.
प्रशिक्षणार्थी व प्राध्यापक वृंद

# क्षणचित्रे



२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाचे आयोजन



सावित्रीबाई फुले जि.प. कन्या शाळा अंतर्गत छात्र सेवाकाळ प्रसंगी बी.एड्. प्रशिक्षणार्थी - मार्गदर्शक डॉ. आशा धारस्कर



IQAC समिती सभा



प्रशिक्षणार्थ्यांची अंध विद्यालयाला भेट



वाचनालयात प्रशिक्षणार्थ्यांसोबत हितगुज करतांना प्राचार्या



निर्मित शैक्षणिक साहित्याचे निरीक्षण करतांना प्राध्यापक

# क्षणचित्रे



ताण तणावाचे व्यवस्थापन ऑनलाईन वेबिनार
प्रेरणास्थान : मा. प्राचार्य डॉ. वसुधा देव
समन्वयक डॉ. आशा धारस्कर





राष्ट्रीय चर्चासत्र २०२०
प्रेरणास्थान : मा. प्राचार्य डॉ. वसुधा देव
समन्वयक : डॉ. आशा धारस्कर




ऑनलाईन राष्ट्रीय चर्चासत्र २०२०
समन्वयक डॉ. आशा धारस्कर प्रास्ताविक करतांना




राष्ट्रीय चर्चासत्र - २०२०
समिती सदस्य



ऑनलाईन राष्ट्रीय चर्चासत्रात सहभागी प्राध्यापक वृंद



मा. शिक्षण सह संचालक, अमरावती विभाग, अमरावती
यांची महाविद्यालयास भेट

# शालेय अनुबंध अहवाल

(School Engagement Report)

शिक्षण स्नातक द्विवर्षीय अभ्यासक्रमाचा शालेय अनुबंध हा एक अनिवार्य व महत्त्वाचा भाग आहे. प्रथम सत्रात शालेय अनुबंधाचा अवधी ९० तास म्हणजे दोन आठवडयांचा असावा असे अभ्यासक्रमात निर्देशित केले आहे. त्यानुसार बी.एड.छात्राध्यापक आपल्या प्रशिक्षणातील एका मोठया कालावधीत शाळांमध्ये कार्यरत राहतात.

शालेय अनुबंध हा भावी शिक्षकांच्या पुर्वतयारीचा एक अनिवार्य व महत्वाचा भाग आहे. या अंतर्गत प्रशिक्षणार्थ्यांना खालील उद्देशाने शालेय प्रणालीचे अवलोकन करणे आवश्यक आहे. शाळेला भेट देणे, शालेय प्रणालीचे अवलोकन करणे, शालेय प्रणालीच्या अवलोकनाअंती त्याचा अहवाल तयार करणे.

वरील उद्देशांना मूर्तरुप देण्यासाठी खालील बाबींचे अवलोकन करुन प्रत्यक्ष वस्तुस्थितीच्या आधारे अहवाल सादर करावयाचा आहे.

१) आकार आणि शाळेची सुरक्षितता

२) सामाजिक परिमाणे

३) शैक्षणिक परिमाणे

४) शालेय सुरक्षा

वरील सर्व मुददयांच्या अंतर्गत येणा-या उपमुददयांचा सखोल विचार करुन मा.प्राचार्य डॉ.देव यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनात, प्राध्यापकवृंदाच्या सहकार्याने एका मार्गदर्शिकेचे विकसन करण्यात आले.

प्रवेशित छात्राध्यापकांच्या संख्येनुसार गट करण्यात आले. शाळेतील एकूण विद्यार्थी संख्या लक्षात घेवून तेथील शंभर विद्यार्थीमागे बी.एड.चा एक छात्राध्यापक या प्रमाणात विद्यार्थ्यांचे शाळानीहाय गट करण्यात आले. बी.एड.सत्र-I २०१९-२१ चे शालेय अनुबंध दि.३० डिसेंबर २०१९ ते १४ जानेवारी २०२० या कालावधीत करण्यात आले. या उपक्रमासाठी भारत विद्यालय अकोला, जागृती विद्यालय अकोला, जिजाऊ कन्या विद्यालय अकोला, मनुताई कन्या शाळा अकोला या शाळांची निवड करण्यात आली. छात्राध्यापकांना शाळेत पाठविण्यापूर्वी या उपक्रमाच्या समन्वयक डॉ.संध्या सामुद्रे यांनी दि.३० डिसेंबर २०१९ ते २ जानेवारी २०२० या कालावधीत महाविद्यालयात शालेय अनुबंध कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यशाळेत मार्गदर्शिकेच्या आधारे समन्वयक डॉ.संध्या सामुद्रे यांनी शालेय अनुबंध हा भावी शिक्षकांच्या पूर्वतयारीचा अनिवार्य भाग आहे असे सांगितले. त्यासाठी शाळेत सेवेत असणा-या अनुभवी मुख्याध्यापक, शिक्षक, पर्यवेक्षकांच्या सहवासात प्रत्यक्ष कार्य करुन शालेय प्रणालीचे अवलोकन करण्याची संधी उपलब्ध होत असून त्याव्दारे प्रशिक्षणार्थ्यांचे अनुभव विश्व अधिक समृध्द होते.

शालेय इमारत, परिसर, वर्गखोल्या,संसाधनाची उपलब्धता व उपयोग, विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधा, आंतरव्यक्ती संबंधाची गुणवत्ता, विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी, पालक यांचे समन्यायी वर्तन, अध्यापनाची गुणवत्ता, वर्गव्यवस्था, शिक्षक विद्यार्थ्यांच्या संपादनाविषयीच्या अपेक्षा, शालेय वेळापत्रक निरीक्षण सहभाग इ. बाबी संबंधी मार्गदर्शन करण्यात आले.

शालेय अनुबंध या उपक्रमात सत्र - I च्या प्रशिक्षणार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभागी होवून संपूर्ण शालेय प्रणाली समुदायाचे अवलोकन करुन निर्धारित वेळेत अहवाल सादर केला. बी.एड २०१९-२१ सत्र - I चे

शालेय अनुबंधाचा अवधी ३० तास म्हणजे पाच दिवसांचा आहे. त्यासाठी दोन दिवसांची कार्यशाळा समन्वयक डॉ.संध्या सामुद्रे यांनी महाविद्यालयात घेतली. मार्गदर्शिकेनुसार सर्व बाबींची माहिती विद्यार्थ्यांना दिली. मतावली प्रश्नावली संबंधी मुलाखती घेण्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. दि.१० जानेवारी २०20 ते १५ जानेवारी २०२० या कालावधित शाळेत शालेय अनुबंधाचे आयोजन करण्यात आले. सत्र-I साठी घेण्यात आलेल्या शाळेमध्येच सत्र-II साठी संबंधीत विद्यार्थ्यांना पाठविण्यात आले. त्यामुळे या विद्यार्थ्यांना सत्र I व II मधील शालेय अनुबंध उपक्रम पूर्णपणे व्यवस्थित करण्याची संधी मिळाली. प्रशिक्षणार्थ्यांसाठी आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेत समन्वयक डॉ.संध्या सामुद्रे यांनी प्रशिक्षणार्थ्यांना वर्गव्यवस्थापन, अनुभवी शिक्षकांच्या अध्यापनाचे निरीक्षण, शालेय समुदायातील मानवी व भौतिक संसाधनाचे महत्व आदी संकल्पना व प्रत्यक्ष वस्तुस्थितीचे अवलोकन इत्यादी बाबींसंबंधी मार्गदर्शन केले. शालेय अनुबंध या उपक्रमात प्रशिक्षणार्थ्यांनी शाळेत जाऊन उत्स्फुर्तपणे सहभागी होवून संपूर्ण वर्गव्यवस्थापन, अनुभवी शिक्षकांच्या अध्यापनाचे निरीक्षण, शिक्षकांच्या मुलाखती, विद्यार्थी संवाद कौशल्य अनुभवी शिक्षक वस्तुस्थीतीचे अवलोकन करुन निर्धारित वेळेत अहवाल सादर केला. शालेय अनुबंध उपक्रमासाठी वरील शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे मन:पुर्वक सहकार्य लाभले तसेच या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मा.प्राचार्य डॉ.देव यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ.रोहिणी तडस, डॉ.आशा धारस्क र, डॉ.अर्चना वातकर या सर्व प्राध्यापकांचे प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन व सहकार्य मिळाले.

**डॉ.संध्या उध्दव सामुद्रे**

सहायक प्राध्यापक व समन्वयक, शालेय अनुबंध

# पर्यावरण शिक्षण

शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला येथे पर्यावरण प्रकल्प या अंतर्गत दि.०६/०१/२०२० ला जलप्रदुषण यावर आधारीत पर्यावरणीय कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती. शासकीय अध्यापक महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. डॉ. वसुधा देव मॅडम यांनी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात महत्वाची भूमिका बजावली. सर्व B.Ed व्दितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थींना जलप्रदुषण यावर आधारीत एक सर्व्हे करण्यात आला. प्रा.डॉ.वसुधा देव मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली समाजातील जलप्रदुषण एक समस्या यावर आधारित एक प्रश्नावलीचा आधार घेवून समाजातील लोकांना प्रश्न विचारुन त्यावर नागरिकांचे मन जाणून घेतले. प्रत्येकी ५ नागरिकांना ही प्रश्नावली देवून त्यांचे मत विचारणा केली. त्या जलप्रदुषणाबाबत काही प्रश्न विचारुन त्यांची उत्तरे मागविण्यात आली. जलप्रदुषण तुम्हाला माहीती आहे का ? त्या जलप्रदुषणाला मानव जबाबदार आहे का? प्राण्यामुळे या प्रदुषणाला आळा बसतो का? पाण्याचा वापर आणि जलप्रदुषण यांचा संबंध? मानवी स्तरावर परिणाम होतो का? घरगुती वापरामुळे प्रदुषण साठवलेल्या पाण्यामुळे होणे का? त्याची कारणे, तीची व्यवस्था, सहभागी व्यक्ती? त्यासाठी कोणती जागृती कराल? पर्यटकांमुळे जलप्रदुषण कसे होते? यासारखे काही प्रश्न विचारुन त्याची उत्तरे मागविण्यात आली. शेवटी त्यांचे व्यवस्थापन कसे करावे याविषयी माहिती नागरिकांना देण्यात आली. या प्रकल्पाला सर्वांचे सहकार्य लाभले. जलप्रदुषणाचे काही तज्ज्ञ जलप्रदुषण अधिकारी यांनी सुध्दा आम्हाला मोलाचे मार्गदर्शन केले. यावर आधारित अहवाल लेखन करण्यात आले. जलप्रदुषणाचा मानवी जीवनावर काय परिणाम होतो. त्याचा आपण कशाप्रकारे त्याला आळा घालू शकु यावर काही उपाययोजना आखण्यात आली आणि जलप्रदुषण ही समस्या कशी कमी होईल याकडे लक्ष वेधण्यात आले. त्यासाठी सर्व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले तसेच प्रा.डॉ.देव मॅडम यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. त्याबद्दल मी त्यांची आभारी. धन्यवाद

**डॉ.संध्या उध्दव सामुद्रे**

सहायक प्राध्यापक व समन्वयक, शालेय अनुबंध

# छात्र संसद अहवाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला येथे नियमित व्दिवर्षीय शिक्षण स्नातक अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने बौध्दिक कार्यासोबतच अभ्यासक्रमात अंतर्भूत असलेली अनेक प्रात्यक्षिके व शिक्षकीय गुणवत्ता विकास कार्यशाळा राबविल्या जातात. या प्रात्यक्षिकांचे व कार्यशाळांचे नियोजन व आयोजन करतांना त्यामध्ये सूत्रबध्दता, नियमितता, शिस्त व नियोजितता येण्यासाठी लोकशाही दृष्टिकोनातून प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त निर्माण करणे या प्रमुख उद्देशाने महाविद्यालयामध्ये छात्र संसदेची निर्मीती केली जाते.

व्दिवर्षीय शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम २०१८-२०२० या अभ्यासक्रमाची छात्र संसद संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीच्या विद्यापीठ कायद्याच्या अधीन राहून दि.१६/०२/२०१९ रोजी तयार करण्यात आली. २०१८-२० छात्र संसद खालीलप्रमाणे गठित करण्यात आली.

विद्यापीठ प्रतिनिधी – श्री सुनील समाधान मस्की
विद्यार्थी प्रतिनिधी – श्री. चेतन रवींद्र इंगळे
महिला प्रतिनिधी – कु. आम्रपाली भिमराव मनवर
सांस्कृतिक प्रतिनिधी – कु.अश्विनी सुधीर घुसरकर
क्रिडा प्रतिनिधी – श्री.अंकुश रामेश्वर वाणे

व्दिवर्षीय शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम २०१९-२१ या अभ्यासक्रमाची छात्र संसद महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच संसद समितीचे नियोजित अध्यक्ष मा.डॉ.वसुधा व. देव यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाखाली संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ९९ च्या महाविद्यालयीन विद्यार्थी परिषद गठीत करण्याच्या प्रक्रियेच्या अधीन राहून दि. १८/ १२/ २०१९ रोजी तयार करण्यात आली. गुणवत्तेच्या आधारावर विद्यापीठ प्रतिनिधी, विद्यार्थी प्रतिनिधी, महीला प्रतिनिधी यांची निवड केली गेली तर सांस्कृतिक प्रतिनिधी व क्रिडा प्रतीनीधी यांची निवड केली गेली. २०१९-२१ छात्र संसद खालीलप्रमाणे गठित करण्यात आली.

विद्यापीठ प्रतिनिधी – श्री विकास अरुण खंडारे
विद्यार्थी प्रतिनिधी – श्री. प्रफुल्ल शामराव शेळके
महिला प्रतिनिधी – कु.स्नेहा कृष्णराव उजवणे
सांस्कृतिक प्रतिनिधी – श्री. विशाल सुरेश बुंदेले
क्रिडा प्रतिनिधी – श्री. आकाशसिंग मदनसिंग नेरवैया

दि.२२/१२/२०१९ रोजी प्रार्थना परिपाठ या या कार्यक्रमात संसदेतील सर्व विद्यार्थ्यांचे मा.प्राचार्य डॉ. व. वि. देव यांनी पुष्प देवून अभिनंदन केले व छात्र संसदेतील सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील कार्यवाहीसाठी शुभेच्छा दिल्या.

**डॉ.अर्चना ग. वातकर**
प्रभारी व सहा.प्राध्यापक, छात्र संसद

# संविधान कार्यक्रम अहवाल.

**संविधान जनजागृती मोहीम अंतर्गत घेतलेल्या कार्यक्रमाचा अहवाल.**

महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनालय, उचशिक्षण परिपत्रक क्र.उ. शिस/मिव-१/संविधान दिन / परिपत्राक / २०१९/१५६७ दिनांक ७.११.१९ नुसार शासकीय अध्यापक महावीद्यालय, अकोला येथे खालीलप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

| अ.क्र. | दिनांक | कार्यक्रमाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | २६.११.१९ | संविधान जनजागृती मोहीम उदघाटन व संविधान उद्देशीका वाचन. |
| २. | ६.१२.१९ | भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर (महापरीनीर्वाण दिन कार्यक्रम) |
| ३. | १४.१२.१९ | संविधान दिन एक मैत्रीपर्व पोस्टर स्पर्धा |
| ४. | २६.१२.१९ | संविधान प्रचारक कार्यशाळा विद्यार्थ्यांचा सहभाग. |
| ५. | १८.०१.२० | संविधान अर्थ व परिभाषा निबंध स्पर्धा |

दि.२६ नोव्हेंबर २०१९ रोजी सकाळी ११.३० वा. चिन्मय अभ्यास केंद्र येथे संविधान उद्देशिका वाचन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग, कार्यालयीन कर्मचारी व बी.एड.प्रथम वर्ष व बी.एड. व्दितीय वर्षातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

दि.६ डिसेंबर २०१९ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.वसुधा देव यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आले. दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना आपल्या समूहगीतातून मानवंदना दिली.

यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्र्यावर प्रकाश टाकण्यासाठी आम्रपाली मनवर, मंजुषा तेलगोटे, विकास खंडारे, श्रीकृष्ण गोपनारायण, गौरी खाडे, प्रतीक सोळंके इत्यादी विद्यार्थ्यांनी भाषणे दिलीत. आभारप्रदर्शन कु.स्नेहल सावरकर यांनी केले. अश्विनी अंभोरे व प्रतीक सोळंके या विद्यार्थ्यांनी डॉ.आंबेडकर यांचेवर आधारित स्वरचीत कविता याप्रसंगी सादर केल्यात.

दि.१४ डिसेंबर २०१९ रोजी संवीधान दिन मैत्रीपर्व या विषयावर आधारित बी.एड. व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी काढलेल्या पोस्टर्सची प्रदर्शन भरविण्यात आले. प्रदर्शनाचे उदघाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.देव यांनी केले.

**डॉ.अर्चना ग. वातकर**

प्रभारी व सहा.प्राध्यापक, छात्र संसद

**पोस्टर स्पर्धेचा निकाल याप्रमाणे:-**

सर्वोत्कृष्ट पोस्टर – ममता लंके

उत्कृष्ट पोस्टर – अश्विनी घुसरकर, कोमल इंगळे, युक्ता मराठे, नम्रता युनीस, विद्या परख, प्रशांत मंडासे व प्रीती चुडे

याप्रसंगी आयोजित मा.प्राचार्या डॉ.वसुधा देव यांचे अध्यक्षतेखाली कार्यक्रमात विजेत्या स्पर्धकांचे पुष्प देवून अभिनंदन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे समन्वयक डॉ.वातकर, Performing Art या प्रात्यक्षिकांच्या वेळी डॉ. तडस व सर्व प्राध्यापकवृंद तसेच ग्रंथपाल डॉ.राऊत उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन कु.संगीता उगले यांनी केले तर आभार निकीता उगले यांनी मानले.

दि.२६.१२.२०१९ रोजी Youth for unity & Voluntary Action (YUVA) या स्वयंसेवी संस्थेतर्फे आयोजित संविधान प्रचारक कार्यशाळेसाठी महावीद्यालयातील प्रथम वर्षातील विद्यार्थी, कु.सपना शिरसाट, कु.शुभांगी डोंगरे, कु.सोनाली कुमावत, कु.रागिणी अनासुने, कु.अतीफा फिरदौस मुजफ्फर हुसैन, कु.सय्यदा सुमैय्या, कु.जयश्री तायडे, श्री. चेतन नागे, श्री. प्रतीक सोळंके, कु.गायत्री ठाकूर हे विद्यार्थी सहभागी होते. कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या प्रमाणपत्राचे वितरण मुल्यपरिपाठ कार्यक्रमात करण्यात आले. दि.१८ जानेवारी २०२० रोजी संविधान अर्थ व परिभाषा या विषयावरील निबंध स्पर्धेचे आयोजन बी.एड. व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले होते.

**डॉ.अर्चना वातकर**

समन्वयक/सहा.प्राध्यापक.

**वाचन प्रेरणा दिवस अहवाल.**

दि.१५ ऑक्टोबर २०१९

शासकीय अध्यापक महावीद्यालय, अकोला येथे शासन परिपत्रकानुसार दि.१५ ऑक्टोबर २०१९ रोजी वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला. सर्वप्रथम डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे प्रतिमेस हारार्पण करुन मा. प्राचार्या डॉ. वसुधा देव यांचे अध्यक्षतेखाली वाचन प्रेरणा दिनाचे उद्घाटन करण्यात आले. प्रथम जगात बी.एड. व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी मुली, स्त्रिया व तृतीय पंथी यांना मिळालेल्या शासकीय योजनांचा लाभ व त्याचा मराठी भाषेवर होणारा परिणाम या विषयावर आधारीत सत्र ३ च्या प्रात्यक्षिक ३०१ या स्पर्धेत बी.एड.व्दितीय वर्षातील विद्यार्थी कु. निकीता जाधव, कु.मंजुषा तेलगोटे, कु.संगीता उगले, कु.श्वेता दुबे, कु.मुक्ता मराठे, कु.धनश्री पतिंगे यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे संचलन अश्विनी जोशी, प्रास्ताविक अश्विनी घुसरकर, तर आभार प्रदर्शन निकीता उगले यांनी केले.

व्दितीय सत्रात बी.एड.प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी ग्रंथ वाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथवाचनाने तर विद्यार्थ्यांनी वाचलेल्या भागावर आपली मते मांडली. समारोपीय कार्यक्रमात कार्यक्रमाच्या समनवयक डॉ.अर्चना वातकर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

**डॉ.अर्चना वातकर**

समन्वयक/सहा.प्राध्यापक.

### स्वच्छता पंधरवाडा २०२० अहवाल.

राज्य प्रकल्प संचालनालय महाराष्ट्र, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियाना च्या अंतर्गत आयोजित करावयाचा स्वच्छता पंधरवाडा २०२० कार्यक्रमांतर्गत दि.१६ जानेवारी २०२० रोजी स्वच्छता शपथ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दि.१७ जानेवारी २०२० रोजी Plogging event या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. Plogging event मध्ये बी.एड. व्दितीय वर्ष २०१८-२० च्या विद्यार्थ्यांसाठी प्लॉस्टिक निर्मूलन या विषयावर आधारित विविध घोषवाक्य तयार करुन घेण्यात आले. दु.३.०० वा. सर्व विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली. रॅलीची सुरुवात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.वसुधा देव यांनी हिरवी झेंडी दाखवून केली. महाविद्यालयाच्या परिसरात या रॅलीचे आयोजन करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी स्वच्छ भारत सुंदर भारत या विषयावर पथनाट्य सादर केले. Plogging event मध्ये महाविद्यालयीन स्वच्छता अभियानांतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन डॉ.वातकर यांनी केले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच कार्यालयीन कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

**डॉ.अर्चना वातकर**

समन्वयक/सहा.प्राध्यापक.

### माजी विद्यार्थी संघटना अहवाल.

शैक्षणिक सत्र २०१९-२० या सत्रात माजी विद्यार्थी संघटनेतर्फे दि.८ जानेवारी २०२० रोजी माजी विद्यार्थी कार्यकारिणी सदस्यांची तत्काळ सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत निश्चित केल्यानुसार दि.१२ जानेवारी २०२० रोजी स्पर्धा परीक्षा व टीईटी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.वसुधा देव यांनी केले. या कार्यशाळेसाठी डॉ.सीमा मुळे (विज्ञान व गणित विषय गट), डॉ. विशाल इंगळे (बालमानसशास्त्र व अध्यापन शास्त्र), श्री महेंद्र खोंड (स्पर्धा परीक्षा व TET अभ्यास पध्दती), श्री तेलगोटे (अध्यापन तंत्र) या माजी विद्यार्थ्यांनी विषयतज्ज्ञ म्हणून सहभाग होते. या कार्यशाळेत एकूण ४० विद्यार्थी उपस्थित होते. समारोपीय कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यात या कार्यशाळेमुळे आपल्याला बरेच शिकायला मिळाले अशी मते व्यक्त केली. समन्वयक डॉ.अर्चना वातकर यांनी विद्यार्थ्यांच्या शंकाचे समाधान केले.

बुधवार दि.५ फेब्रुवारी २०२० रोजी मा.प्राचार्या डॉ.व. वि. देव यांचे अध्यक्षतेखाली माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन महावीद्यालयात करण्यात आले होते. उद्घाटक म्हणून प्रभात किड्स अकोलाचे संस्थापक व माजी विद्यार्थी डॉ.गजानन नारे हे व्यासपीठावर उपस्थित होते. माजी विद्यार्थी संघटनेचे पदाधिकारी यावेळी व्यासपीठावर होते.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वतीपूजन करुन मेळाव्याची सुरुवात करण्यात आली. यावेळी बी.एड. व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी शारदास्तवन व स्वागत गीत गायले. उद्घाटकांचा परिचय कु.मंजुषा तेलगोटे यांनी करुन दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी विद्यार्थी संघटनेच्या समन्वयक डॉ.अर्चना वातकर यांनी केले. माजी विद्यार्थी संघटना २०२०-२०२३ च्या कार्यकारिणी

समितीचे सदस्य सचिव श्री. जितेंद्र काठोळे यांनी माजी विद्यार्थी संघटनेच्या कार्याची माहिती करुन दिली. श्री.रोहीत हिवरकर, प्रा.ऋषीकेश चोपडे, कु.मनप्रीत यांनी याप्रसंगी महाविद्यालयाबद्दल आपली मनोगते व्यक्त केली. मेळाव्याचे उद्घाटक डॉ.गजानन नारे यांनी आपल्या उद्घाटकीय भाषणातून महाविद्यालयीन आठवणींना उजाळा दिला. स्वत:शीच स्वत:ची स्पर्धा करा व यशदायी व्हा असा मोलाचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना यावेळी दिला. कार्यक्रमाचे संचलन बी.एड. व्दितीय वर्षाची विद्यार्थीनी कु.अश्विनी घुसरकर यांनी केले तर आभारप्रदर्शन माजी विद्यार्थी संघटनेचे कार्यकारी समितीचे कोषाध्यक्ष डॉ.गजानन डोईफोडे यांनी केले.

**डॉ.अ.ग.वातकर**

समन्वयक व सहा.प्राध्यापक

माजी विद्यार्थी संघटना

**दिन विशेष हारार्पण कार्यक्रमाचा अहवाल**

शासन परीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.जपूनी २२१८/प्र.क्र.१९५/२९, दि.२६.१२.१८ च्या परिशिष्टानुसार महाविद्यालयात खालील हारार्पण कार्यक्रम घेण्यात आले. (शैक्षणित सत्र २०१९-२०)

१. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती
 - २३ जुलै २०१९

२. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती
 - १ ऑगस्ट २०१९

३. क्रांतिसिंह नाना पाटील जयंती
 - ३ ऑगस्ट

४. सद्भावना दिवस
 - २० ऑगस्ट २०१९

५. राजे उमाजी नाईक जयंती
 - ७ सप्टेंबर २०१९

६. पं. दिनदयाल उपाध्याय जयंती
 - २५ सप्टेंबर २०१९

७. म.गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती
 - २ ऑक्टोबर २०१९

८. महर्षी वाल्मिकी जयंती (तिथीनुसार)
 - १३ ऑक्टोबर

९. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंती
 - १५ ऑक्टोबर २०१९

१०. राष्ट्रीय संकल्प दिवस व वल्लभभाई पटेल जयंती
 - ३१ ऑक्टोबर २०१९

११. संविधान दिन
 - २६ नोव्हेंबर २०१९

१२. संत जगनाडे महाराज जयंती
 - ८ डिसेंबर

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.जपूनी २२१९/प्र.क्र.७१/२९ दि.१२ डिसेंबर २०१९ चे परिशिष्टानुसार महाविद्यालयात खालील हारार्पण

१३. सावित्रीबाई फुले जयंती
 - ३ जानेवारी २०२०

१४. स्वामी विवेकानंद जयंती व
 माँ जिजाऊसाहेब जयंती
 - १२ जानेवारी २०२०

१५. नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती
 - २३ जानेवारी २०२०

१६. संत सेवालाल महाराज जयंती
 - १५ फेब्रुवारी २०२०

**डॉ.अ.ग.वातकर**

दिनविशेष प्रभारी/सहा.प्राध्यापक

# शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा

शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला येथे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती च्या अभ्यासक्रमा अंतर्गत द्विवर्षीय अभ्यासक्रम २०१९-२१ या अभ्यासक्रमासाठी दिनांक १५ जानेवारी ते १८ जानेवारी २०२० या कालावधीत ज्ञानरचना वर आधारित शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेची सुरुवात महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. वसुधा देव यांचे अध्यक्षतेखाली व श्रीमती तृप्ती राऊत यांचे उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या उद्घाटन कार्यक्रमाने झाला. मा. प्राचार्य यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून शै.साहित्याचे शिक्षकांच्या दृष्टीने असणारे महत्व सांगितले. प्रास्ताविक शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. अर्चना वातकर यांनी केले.

दि.१५ जाने. २०२० च्या प्रथम सत्रात श्रीमती तृप्ती राऊत यांनी गणित विषयातील विविध शैक्षणिक साहित्यांची माहिती करून दिली तसेच विध्यार्थी प्रशिक्षणार्थ्यांकडून टाकते, आलेख, चर्चा इत्यादीद्वारे शैक्षणिक साहित्य तयार करून घेतले.

दुसऱ्या सत्रात श्रीमती गीता इंगळे यांनी विज्ञान विषयावर विविध गटांअंतर्गत चर्चा करून विज्ञान विषयातील शैक्षणिक साहित्य तयार करण्यासाठी मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांकडून विज्ञान विषयाचे शै. साहित्य तयार करून घेतले.

दि. १६ जाने. २०२० रोजी श्रीमती आकांक्षा देशमुख यांनी भाषा विषय शैक्षणिक साहित्य निर्मिती या विषयाअंतर्गत विद्यार्थ्यांना ज्ञानरचनावाहानुसार शै.साहित्य निर्मिती करण्यासाठी मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांचे गट तयर करून शै. साहित्य निर्मिती करण्यात आली. यात विविध प्रकारचे तक्ते, आकार यांचा वापर करून प्रतिकृती विद्यार्थ्यांनी तयार केला.

दि. १७ जाने. २०२० रोजी श्रीमती आकांक्षा देशमुख यांनी सामाजिक शास्त्र विषय शैक्षणिक साहित्य निर्मिती या विषयाअंतर्गत इतिहास व भुगोल असे विषयावर विद्यार्थ्यांचे गट तयार करून आशयानुरूप शै. साहित्यात विविध नकाशे, प्रतिकृती इत्यादी.

विद्यार्थ्यांनी तयार करण्यासाठी मार्गदर्शन केले.

दि. १७ जाने. २०२० च्या दुसऱ्या सत्रात कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. अर्चना वातकर यांनी अहवाल लेखन विषयी विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दि. १८ जाने. २०२० रोजी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन भरविण्यात आले. या प्रदर्शनीचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. वसुधा देव यांनी केले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शैक्षणिक साहित्याचे मुल्यांकन करून भाषा विभाग, सामाजिक शास्त्र विभाग, विज्ञान विभाग व गणित विभाग यातील उत्कृष्ट शैक्षणिक साहित्यात खालीलप्रमाणे क्रमांक देण्यात आले.

भाषा विभाग :-

प्रथम क्रमांक – सोनाली कुमावत व रागिणी उनसुमे

द्वितीय क्रमांक – रोशनी कोठारी व पल्लवी बोराखडे.

तृतीय क्रमांक – योगिता खडे.

सामाजिक शाळा विभाग :

सामाजिक शाळा या अध्यापन पद्धतीचा सर्व विद्यार्थ्यांनी

मिळून तयार केलेले शै. साहित्य.

प्रथम क्रमांक – भारताची संसद

द्वितीय क्रमांक – योगिता खडे व पल्लवी बोराखडे

तृतीय क्रमांक – मनिषा गायकवाड, रोशनी कोठारी व ग्लोरी खाडे.

विज्ञान विभाग – विज्ञान अध्यापन पद्धतीच्या सर्व विद्यार्थ्यांनी मिळून खालील शैक्षणिक साहित्याला क्रमांक देण्यात आले.

प्रथम क्रमांक – DN- Model आणि गतीचे प्रकार

द्वितीय क्रमांक – Life Cycle of Butterfly Am{U Diapalacement of Distance

तृतीय क्रमांक – Sounds in Daily Life Am{U Hydrocarbon

**गणित विभाग –**

गणित अध्यापन पद्धतीच्या सर्व विद्यार्थ्यांनी मिळून तयार केलेल्या खालील शै. साहित्यांना क्रमांक देण्यात आलेत.

**प्रथम क्रमांक – गणितीय आकृत्या**

द्वितीय क्रमांक – Decimal place value आणि समांतर रेषा व छेद

तृतीय क्रमांक – बहुपदीचे प्रकार आणि Types of -ngles

समारोपीय कार्यक्रमात क्रमांक प्राप्त सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. कार्यशाळेत रममान होऊन शै. साहित्य निर्मिती कार्यशाळेत प्रभात किड्स विद्यालयाच्या तृप्ती राऊत व गीता इंगळे यांनी विध्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

डॉ. अर्चना वातकर
शै. साहित्य निर्मिती
कार्यशाळा समन्वयक

# SUPW कार्यशाळा

SUPW WORK Experience विकास व सामाजिक विकास ई. कला कौशल्याच्या विकास करण्याच्या उद्देशाने या कार्यशाळेची सुरवात अतिशय आनंदात झाली. कार्यशाळेच्या उद्घाटन दि. १८/१२/२०२१ ला करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्रा. मा. डॉ. वसुधा देव मॅडम होत्या. या कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या सर्व प्राध्यापकांची उपस्थिती होती. कार्यशाळेमध्ये शिक्षक-प्रशिक्षणार्थींना कार्यानुभव शिक्षण देण्यासाठी कला क्षेत्रातल्या उच शिक्षित शिक्षिका कु. शीतल वानखडे मॅडम यांची सुद्धा उपस्थिती उद्घाटन कार्यक्रमास लाभली. कु. सपना शिरसाट यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले.

दि. १८/१२/२०२१ ला उद्घाटन कार्यक्रमानंतर कृतियुक्त व पद्धतशीर रित्या कार्यात्मक शिकवणीसा सुरवात करण्यात आली. सर्व प्रशिक्षणार्थींची कलात्मक शिक्षण घेण्याची कुतूहल वाख्यान्याजोगे होती. शाडू माती पासुन गणपती बनविण्याचे प्रशिक्षण देण्यास कु. शितल वानखडे मॅडम यांनी सुरुवात केली. त्यांच्या प्रशिक्षणातून शिक्षक-प्रशिक्षणार्थींनी सुंदर गणेशमूर्ती, फळे. ई. बनविले.

दि. १९ डिसेंबर रोजी गणेश मूर्ती व विविध शाडू-मातीच्या कलाकृतींना अधि पांढऱ्या रंगाने रंगोटी करण्यात आली. त्यांनतर रंगीत कागदापासून लिफाफे बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. शिक्षक-प्रशिक्षनार्थींनी लिफाफे बनवून ते आणखी आकर्षक बनविण्य साठी त्यावर सजावट केली.

दि. २० डिसेंबर रोजी, गणेशमूर्ती व इतर शाडू मातीच्या कलाकृतींना विविध रंगाची रंगरंगोटी करण्यात आली. रंगरंगोटी झाल्यावर फाईल फोल्डर बनविण्याचे प्रशिक्षण देयात आले. प्रशिक्षणार्थी पद्धतशीर रित्या फाईल फोल्डर बनविले व त्याची सजावट केली. दि. २१ डिसेंबर रोजी कागदापासून पिशव्या बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणार्थींनी पर्यावरणास जपणाऱ्या ह्या कागदी पिशव्या बनविल्या व त्यांची सजावट केली. त्या पिशव्यांवर काही प्रशिक्षणार्थींनी पर्यावरण रक्षणाचे काही संदेश सुद्धा लिहिले. उर्वरित वेळेत पाच मिनिटात कागदापासून आप-आपल्या कल्पक्तेतून प्रशिक्षणार्थींना काही कलाकृती बनविण्यासाठी सांगण्यात आले. प्रशिक्षनार्थींनी त्यांच्या सृजनात्मकतेने विविध आकर्षक कागदी कलाकृती बनविल्या. समारोपीय कार्यक्रमाचे आयोजन दि. २३ डिसेंबर २०१९ रोजी, महाविद्यालयाच्या योगा व हॉल मध्ये करण्यात आले. प्रशिक्षणार्थींनी बनविलेल्या सर्व कलाकृतींचे प्रदर्शन ठेवण्यात आले. महाविद्यालयाच्या प्राचार्य तसेच सर प्राध्यापकांनी प्रदर्शनीची पाहणी केली. या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्य मा. डॉ. वसुधा देव होत्या. कार्यक्रमास महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद व सर्व शिक्षक प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणातून मा. डॉ. देव मॅडम सर्व प्रशिक्षणार्थींची स्तुती केली. या समारोपीय कार्यक्रमाचेसंचालन प्रा. डॉ. वसुधा देव यांनी केले. या प्रकारे SUPW / Work Experience या शाळेमधून सर्व शिक्षक प्रशिक्षनार्थींच्या रचनात्मकता, सृजनशीलता व स्वनिर्मित हस्तकलांना वृद्धिंगत करण्यास वाव मिळाली.

प्रा.डॉ.वसुधा देव
समन्वयक,
अहवाल लेखन - **पायल पाटील**

# वाचन आणि परावर्तन कार्यशाळा

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठा अंतर्गत B.Ed. २०१९-२०२१ या अभ्यासक्रमा अंतर्गत EPC 105 Reading and Reflectiong on Texts हे प्रात्याक्षिक प्रथम सत्रासाठी दिलेले आहे.

दिनांक २३ डिसेंबर २०१९ ते ०४ जानेवारी २० असे एकूण दहा दिवस या काळात जवळपास ६० तास पुस्तक वाचन करण्यात आले.

आपण स्वयं अध्ययनाच्या अवस्थेत आहात. परंतु ह्याबाबत आपणास सराव गरजेचा आहे.तुम्ही जेव्हा एखाद्या पुस्तकाचा अभ्यास करता तेव्हा तेव्हा त्याबाबतची तुमची एक विचारधारा तयार होणे आवश्यक असत. एव्हढेच नाही तर त्या वाचनाचा अन्वयार्थ काढण्याचा एक सराव पण आवश्यक असतो. .त्याबाबतचे आपले दृष्टिकोन विकसित व्हावा लागतो.हा दृष्टिकोन केवळ वाचना पुरताच मर्यादित नाही तर जेवढी अध्ययन संसाधने आज उपलब्ध आहेत. त्या सर्वांचा वापर जेव्हा आपण करतो. त्यातून आपला दृष्टिकोन विकसित होत असतो ह्या अनुषंगाने हा विषयाचे कृतीसत्र आपणासाठी अत्यंत महत्वाचे आहे.

ह्याचे उद्देश खालील प्रमाणे आहेत:- हे उद्देश खाली चित्रात दाखविले आहेत.

ह्यासाठी आपण खालील प्रकारे हा उपक्रम राबविण्यात आले :

१) ह्या साठी १० दिवसाचे प्रतिदिन ०६ तासिका चे वेळापत्रक लावण्यात आले.

२) हे संपूर्ण कृतीसत्र ग्रंथालयात घेण्यात आले.

३) सर्वप्रथम खालील पैकी एका साहित्य प्रकारची निवड करायची आहे हे सांगण्यात आले.

१. वनचरित्र,आत्मचरित्र

२. कादंबरी,नाटक,कविता,निबंध इ साहित्य

३. प्रकारची आपण निवड करू शकता

४. काही नामांकित पुस्तके समाजशास्त्र

५. तत्वज्ञान मानसशास्त्र राज्यशास्त्र इ

विषयावर आधारित वरील पुस्तकांना अनुसरून आपल्याला खालील मुद्द्यांच्या वाढते. त्यांचे मूल्यमापन करावयाचे आहे.

१. ह्या पुस्तकातील मुख्य मुद्दे कोणते।

२. मुद्दे कसे विकसित केले आहे।

३. त्याचा उद्देश काय।

४. याचा प्रभाव काय।

५. त्याची तात्विक चौकट काय आहे.

६. ह्यातील कोणत्या कल्पनेने प्रेरित झालो.

७. का

८. ह्या कल्पना अंतर्भूत विचारांची विरुद्ध आहे की मिळती जुळती ?

९. माझ्या जीवन आकलनाशी ह्या संकल्पना कितपत मिळत्या जुळत्या आहेत।

१०. समाजाबद्दल चे माझ्या आकलनाशी त्या कितपत मिळत्या जुळत्या आहेत।

११. ह्या संकल्पनामुळे माझ्या विचारांच्या कक्षा किती रुंदावल्या।

१२. माझी मानसिक क्षितिजे किती रुंदावली।

खालील पैकी तात्कालिक विषयाच्या आधारे एक शीर्षी ची निवड करू शकता ;

(१) वृत्तपत्रात आलेल्या सामाजिक शैक्षणिक

राजकीय आणि आर्थिक विषयावर लेखाची आपण निवड करू शकता

(२) प्रथितयश नियतकालिकातील लेख उदा. India today,Economic and political weekly,Business today, journals of Education,.

(३) CNN, BBC, अशा न्यूज चॅनेल वर येणाऱ्या documentary film ज्या current issue,historical social political बाबींवर आधारित आहेत. वरील पैकी जर आपणास निवड करण्याची इच्छा असेल तर आपण निवड करू शकता ही निवड केल्यावर खालील निकषानुसार आपण Reflections तयार करावे.

(१) ह्या लेखामुळे मला विशिष्ट विषय समजायला कशी मदत झाली।

(२) माझ्या संकल्पनांना ह्या लेखामुळे कशी प्रेरणा मिळाली म्हणजेच ज्या विशिष्ट विषयावर हा लेख आधारित आहे.
त्या विषयाच्या अधिक अभ्यास बाबत मला कशी प्रेरणा मिळाली

(३) ह्या विषयाबाबत माझ्या मनात जे गृहितके होती. त्या गृहितकांना ह्या लेख मूळे कसे आव्हान मिळाले.

(४) सामाजिक राजकीय शैक्षणिक आर्थिक विविध विषयाबाबत चे चिकित्सक विवेचन कसे करण्यात आले आहे। वरील बाबीवर आपण वाचताना विचार करावयाचा आहे किंबहुना असे म्हणता येईल की वरील बाबी या माझ्या अभ्यासाची मार्गदर्शक तत्वे आहेत.

आता याबाबत म्हणजेच वाचन झाल्यावर तुम्हाला खालील कृती करणे व त्यावर आधारित अहवाल तयार करणे आवश्यक आहे.

(१) जो लेख तुम्ही वाचला आहे. त्या लेखांच्या आधारे तुमचा व्यक्तिगत प्रतिसाद लिहा ह्यातून हे लक्षात येईन की तुम्ही स्वतः त्या करिता वेळ दिलेला आहे.

(२) त्या लेखातील ह्या प्रमुख संकल्पना आहेत त्याला आशयांकित करा

(३) आता स्वतःला प्रश्न विचारा ह्या संकल्पनांचे माझ्या दृष्टिकोनातून महत्व काय अर्थ काय आहे व ते लिहून काढा.

(४) ह्या लेखातील असे मुद्दे शोधून काढा ज्या मुद्द्यांशी तुम्ही सहमत व असहमत आहेत व त्याची कारांमीमांसही लिहा

(५) त्यावर टीका समीक्षण करणाऱ्या साहित्याची पण शोध घ्या आणि ही टीका का करण्यात आली आहे त्याचा शोध घ्या.
तसेच माननीय प्राध्यापक देव मॅडम यांनी खालील प्रमाणे विद्यार्थ्यांना माहिती दिली.

कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी आवश्यक त्या सूचना देऊन विद्यार्थ्यांची वेगवेगळे ५ गट पाडण्यात आले.; जी पुस्तके आपण निवडली त्याचे वाचन करा आणि मुद्यांना अनुसरून नोट्स तयार अशा प्रकारच्या सूचना ते मॅडम यांनी शिक्षक प्रशिक्षकांना केल्या.

१) ह्या पुस्तकातील मुख्य मुद्दे कोणते.

२) ते मुद्दे कसे विकसित केले आहे.

(३) त्याचा उद्देश काय.

(४) त्याचा प्रभाव काय.

(५) त्याची तात्त्विक चौकट काय आहे.

(६) ह्यातील कोणत्या कल्पनेने प्रेरित झालो.

(७) का.

(८) ह्या कल्पना अंतर्भूत विचारांची विरुद्ध आहे की मिळती जुळती ?

(९) माझ्या जीवन आकलनाशी ह्या संकल्पना कितपत मिळत्या जुळत्या आहेत.

(१०) समाजाबद्दल चे माझ्या अकलनाशी त्या कितपत मिळत्या जुळत्या आहेत.

(११) ह्या संकल्पनामुळे माझ्या विचारांच्या कक्षा किती रुंदावल्या.

(१२) माझी मानसिक क्षितिजे किती रुंदावली.ह्या मुद्द्यांना अनुसरून पूर्ण पुस्तकाचे समीक्षण तयार करा. तसेच ज्यांनी समजा पुस्तकाची निवड केली नसेल तर खालील पैकी एक घटकाची निवड करू शकता, आपण खालील पैकी तात्कालिक विषयाच्या आधारे एक text ची निवड करू शकता ;

(१) वृत्तपत्रात आलेल्या सामाजिक शैक्षणिक राजकीय आणि आर्थिक विषयावर लेखाची आपण निवड करू शकता

(२) प्रथितयश नियातकालिकातील लेख उदा. India today,Economic and political weekly,Business today , journals of Education,.

(३) CNN, BBC, आशा न्यूज चॅनेल वर येणाऱ्या documentary film ज्या current issue,historical social political बार्बीवर आधारित आहेत। वरील पैकी जर आपणास निवड करण्याची इच्छा असेल तर आपण निवड करू शकता. ही निवड केल्यावर खालील निकषानुसार आपण Reflections तयार करावे।

(१) ह्या लेखामुळे मला विशिष्ट विषय समजायला कशी मदत झाली ?

(२) माझ्या संकल्पनांना ह्या लेखामुळे कशी प्रेरणा मिळाली म्हणजेच ज्या विशिष्ट विषयावर हा लेख आधारित आहे त्या विषयाच्या अधिक अभ्यास बाबत मला कशी प्रेरणा मिळाली

(३) ह्या विषयाबाबत माझ्या मनात जे गृहीतके होती त्या गृहितकाना ह्या लेख मूळे कसे आव्हान मिळाले ?

(४) सामाजिक राजकीय शैक्षणिक आर्थिक विविध विषयाबाबत चे चिकित्सक विवेचन कसे करण्यात आले आहे ?

(२) त्या लेखातील ह्या प्रमुख संकल्पना आहेत त्याला आशयांकित करा

(३) आतास्वतःला प्रश्न विचारा ह्या संकल्पनांचे माझ्या दृष्टिकोनातून महत्व काय अर्थ काय आहे व तेलिहून काढा.

(४) ह्या लेखातील असे मुद्दे शोधून काढा ज्या मुद्द्यांशी तुम्ही सहमत व असहमत आहेत व त्याची कारांमीमांसही लिहा

(५) त्यावर टीका करणाऱ्या साहित्याची ण शोध घ्या आणि ही टीका का करण्यात आली आहे त्याचा शोध घ्या च्या शिक्षक प्रशिक्षकांनी एखादी फिल्म निवडली असेल व त्यावर आपणास reflections तयार करायचे असेल

तर त्यासाठी पुढील मुद्देच्या आधारे तयार करा.

१) हीच फिल्म मी का निवडली.

२) ह्या फिल्म चे प्रमुख कथानक काय.

३) फिल्म मधील प्रमुख पात्रे कोणती.

४) प्रत्येक पात्राची फिल्म मधील स्थान,

५) प्रत्येक पात्र भावनिक दृष्ट्या कसे उलगडत जाते

६) प्रत्येक पात्राचे कथानकात स्वभाव वैशिष्ट्य

७) फिल्म मध्ये कोणकोणती मानवी मूल्य आहेत,

८) कोणती सामाजिक /कौटुंबिक समस्या ह्या फिल्म मध्ये मांडली आहेत

९) माझ्या अकलनाशी ती समस्या कशी मिळतीजुळती आहे,

१०) माझे संबंधित विषयाबाबत आकलन कसे विस्तृत झाले.

११) संबंधित फिल्म मधून कोणता बोध मिळतो

१२) त्या फिल्म चे साहित्यिक सामाजिक निर्मिती मूल्य ह्या दृष्टिकोनातून महत्व

१३) त्या फिल्म मधील अपूर्णता

१४) फिल्म मध्ये काम करणारे कलाकार,व त्यांनी त्यांच्या अभिनयाला दिलेला न्याय

१५) फिल्म चे दिगदर्शक दिग्दर्शन,व त्यातील प्रभावी मुद्दे

१६) त्या फिल्म चा प्रभाव.

एकूण पाच ग्रुप व सर्व शिक्षक प्रशिक्षकांनी आपल्या ग्रुप आपण वाचलेले लेखाबद्दल तसेच निवडलेल्या विषयाबद्दल गटानुसार सादरीकरण करण्यात आले. सादरीकरणासाठी अव्श्यक त्या साधनांचा उपयोग सुद्धा करण्यात आला. सर्व गटाचे सादरीकरण झाल्यानंतर शिक्षक प्रशिक्षकांना त्यांना या कार्यशाळेत आलेल्या अनुभवाबद्दल तसेच वाचनामुळे त्यांच्या विचारात झालेल्या बदलांबद्दल आपला अनुभव सर्वांना सांगण्यास संधी देण्यात आली. अशाप्रकारे या दहा दिवसीय कार्यशाळेचा समारोपीय कार्यक्रम ४ जानेवारी २०20 रोजी पार पडला. समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माननीय डॉक्टर देवी मॅडम यांनी सर्व शिक्षक प्रशिक्षकांना मार्गदर्शन केले. नंतर ग्रंथालयातील पुस्तके परत करून विद्यार्थ्यांच्या पुढच्या कार्य सारणी साठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

**डॉ. वसुधा देव**
समन्वयक,
वाचन व परावर्तित विषय वस्तु
अहवाल लेखन : सपना शिरसाट

## अशी पाखरे येती...



**ऐश्वर्या अविनाश गवई**
शांती नगर, जुने शहर,
डाबकी रोड, अकोला
मो. ९३७०७०३७४६



**कु. माधुरी गणेश डिवरे**
बाळापूर नाका, मारती प्लॉट, धनश्री
मेडिकल जवळ,
अकोला
मो. ९८८१८९८००९



**कु. अश्विनी सुधीर पुसरकर**
तापडीया नगर, रामदास पेठ,
अकोला
मो. ९३७०२२५६५९



**निर्मला महादेवराव भिसे**
बानखडे नगरच्या मागे, गुरुदेव नगर,
डाबकी रोड, अकोला
मो. ९०२१२४९८६९



**कु. वैशाली श्रीकृष्ण उगले**
मु. कळंबा बु., पो. कसुरा
ता. बाळापूर जि. अकोला
मो. ९०२११३४०५५



**कु. वैष्णवी पी. भुईभार**
द्वारा : शोभा बी. भुईभार, केळकर
हॉस्पीटल जवळ, रामदासपेठ,
अकोला
मो. ९८२२१२५७५३



**कु. निकिता रामभाऊ उगले**
मु. कळंबा बु. पो. कसुरा
ता. बाळापूर
जि. अकोला
मो. ९६२३२४३१७४



**विजया श्रीकृष्ण गव्हाड**
मु. हिंगे गव्हाड, पो. मामुलवाडी
ता. नांदुरा जि. बुलडाणा
मो. ९३०९५०९०१६



**कु. प्रिती ज्ञानेश्वर चुडे**
लहान उमरी, गायत्री मंदीराजवळ,
हनुमान नगर, अकोला
मो. ८९७५०७३०७१



**मोनिका राजगोपाल तेलंग**
जुना राधाकिसन प्लॉट माळ्ठ
कारमेल शाळे जवळ, गोरे अपार्टमेंट
नं८, फ्लॅट नं.१, अकोला
मो. ९९७५९६०१०८



**कु. दिपाली सुधारकर पवार**
पोलिस स्टेशन जवळ, कारंजा लाड
जि. वाशिम
मो. ७०५७२१३७४३



**कु. धनश्री वसंतराव पतिंगे**
दिक्षीत नगर, छोटी उमरी,
अकोला
मो. ९१३०४१०४५८

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला

